रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ८५ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## नवविवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**रेवदंडा :** रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोर्लई गावात एका नवविवाहित तरुणीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना २९ ऑगस्ट रोजी उघडकीस आली आहे. मयत तरुणीचे नाव भाग्यश्री समीर बलकवडे (३२) असून, ती आपल्या नवविवाहित आयुष्यातील अवघ्या वर्षभरातले आनंदाचे क्षण साजरे करत होती. गणेशोत्सवासाठी कुटुंब मूळ गाव कोर्लई येथे आले होते. दीड दिवसाचा गणपती उत्सव आनंदात साजरा झाला, परंतु दुसऱ्याच दिवशी अचानक वादातून ही घटना घडली. मयत तरुणीची आई मंजुळा दत्ता पाटील (५५, राबोडी–ठाणे) यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार भाग्यश्रीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा पती समीर विलास •➤ पान २ वर

रायगड, रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹










# हत्ती रोगाची धास्ती

## ।। गृहभेटीतून रुग्णांची शोधमोहीम जोरात ।। जिल्हा आरोग्य प्रशासन लागले कामाला

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात हत्तीरोगाच्या रुग्णांची संख्या वाढण्याची चिंता निर्माण झाली आहे.त्यामुळे हे संकट दूर करण्यासाठी आरोग्य विभागाने आता पावले उचलली आहेत. जिल्ह्यात हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून गृहभेटीद्वारे रुग्ण शोधण्याचे काम गावपातळीवर वेगाने सुरु करण्यात आले आहे. हत्तीरोगाची धास्ती कमी करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.**

क्युलेक्स या डासामार्फत हत्तीरोग होतो. या डासांच्या चाव्याद्वारे होणारा हा गंभीर रोग आहे. शरीराच्या अवयवांमध्ये जास्त सूज येते. रायगड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून हत्तीरोगाचे २३६ रुग्ण असून, त्यांच्यावर वेळेवर उपचार केले जात आहेत. या आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून जिल्हा हिवताप विभागाकडून वारंवार जनजागृती केली जात आहे. हत्तीरोग रुग्णांची वेळोवेळी तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्याचे काम केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून या आजाराला रोखण्यासाठी जिल्हा हिवताप विभागाने पावले उचलली आहेत. जिल्ह्यात १६ ऑगस्टपासून हत्तीरोग रुग्ण शोधमोहीम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून जिल्ह्यात गृहभेटी सुरु करण्यात आल्या आहेत.

हत्तीरोगाला रोखण्यासाठी आरोग्य विभागाने हत्तीरोग रुग्ण शोधमोहीम हाती घेतली आहे. आरोग्य सेवक, सेविका, अंगणवाडी सेविका, आशा व स्वयंसेवकांच्या मदतीने गृहभेटीद्वारे तपासणी करण्यात आली. घरोघरी जाऊन नागरिकांना भेटून त्यांच्यामध्ये या आजाराबाबत जनजागृती करून त्यांना काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे.

हत्तीरोग असल्यास त्याची माहिती घेण्याचे कामही यंत्रणेमार्फत सुरु केले आहे. आरोग्य कर्मचारी आपापल्या कार्यक्षेत्रात गृहभेटी करून हत्तीरोग रुग्ण शोधमोहीम राबवित आहेत. कंटेनर सर्वेक्षण करून डोसोत्पत्तीची ठिकाणे नष्ट करणे, नाले, गटारे वाहती करणे, ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधून धूर फवारणी केली जात आहे. हत्तीरोग रुग्णांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी हिवताप विभागाने कंबर कसली आहे. ही मोहीम ३१ ऑगस्टपर्यंत राहणार आहे.



### डॉक्टर सांगतात...

**हत्तीरोग रुग्णांनी तीव्र लक्षणे टाळण्यासाठी पायांची किंवा बाधित अवयवांची साबण आणि पाण्याने स्वच्छता ठेवावी. पायाच्या आकाराप्रमाणे चपला घालाव्यात. पायाला जखम होणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या आसपासच्या परिसराची स्वच्छता राखावी.**

### हत्तीरोग म्हणजे काय?

**फायलेरिया (हत्तीरोग) हा क्युलेक्स मॅनसोनियाची लागण झालेल्या डासांच्या चाव्याद्वारे होणारा एक गंभीर रोग आहे. हे लिम्फॅटिक सिस्टमला नुकसान करते. जर ते रोखले नाही, तर शरीराच्या अवयवांमध्ये जास्त सूज येऊ शकते.**

### नागरिकांनो, काळजी घ्या!

**जनतेने आपला परिसर स्वच्छ ठेवणे, गटारे, नाले वाहते करणे, घराच्या बाजूला न वापरती भांडी, टायर्स यांची योग्य विल्हेवाट लावणे, शौचालयाच्या व्हॅट पाईपला जाळी बांधावी, खिडक्यांना जाळी लावाव्यात, डास होणार नाही याची काळजी घ्यावी. हत्तीपाय व अंडवृद्धी आजाराची माहिती देऊन कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अश्विनी सपकाळ यांनी केले.**

### क्युलेक्स डासांची उत्पत्ती कुठे होते?

**तज्ज्ञांच्या मते, क्यूलेक्स प्रजातीचे डास दूषित पाणी आणि घाणीच्या जागी मोठ्या प्रमाणात वाढतात. हे डास पडक्या इमारती, नाल्यांच्या बाजूला असणारी घरे या परिसरात मोठ्या प्रमाणात आढळून येतात.**

# रोह्यात टेम्पोभर गुटखा जप्त

■ **नाकाबंदीत पोलिसांचा थरारक पाठलाग**

■ **सहा जण अटकेत, दोघे अद्याप फरार**

**। रोहा । प्रतिनिधी ।**

ऑल आऊट ऑपरेशन अंतर्गत कुंडलिका पुलाशेजारी असलेल्या हॉटेल रोहा प्राईड येथे नाकाबंदीकरिता नेमण्यात आलेल्या पोलिसांनी मध्यरात्री एका संशयस्पद पीकअप टेम्पो चालकाला चौकशीकरिता थांबण्यास सांगितले.

दरम्यान, सदर पीकअप टेम्पो चालकाने गाडी न थांबविता पसार झाला. त्यानंतर सुरु झालेल्या थरारनाट्यात पोलिसांनी पाठलाग करुन चालकाची धरपकड केली. या कारवाईत पोलिसांनी दोन लाख ६५ हजार रुपयांचा टेम्पोभर मुद्देमाल जप्त केला असून, रोहा पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सहा जणांना अटक करण्यात पोलिसांना यश आहे, तर अन्य दोघे अद्याप फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान ऐन गणेशोत्सवात पोलिसांनी गुटखा माफियांच्या मुसक्या आवळल्याने रोहा पोलिसांवर कौतुकाचा •➤ पान २ वर



## रायगडात ड्रोन उडविण्यास बंदी

**रेवदंडा :** जिल्ह्यातील संवेदनशील भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुढील दोन महिन्यांसाठी रायगड जिल्ह्यात पोलीस विभागाची पूर्वपरवानगीशिवाय ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यास बंदीचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत.पोलीस अधीक्षकांच्या अहवालानुसार, रायगड जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था तसेच समुद्रालगतचे भाग हे दहशतवादी कारवायांसाठी अत्यंत संवेदनशील मानले जातात. याआधी देशातील विविध भागांत •➤ पान २ वर

## नांगरवाडीनजीक साकव कोसळला

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी गावाच्या नजीकचा मुख्य रस्त्यावरील छोटा साकव कोसळला आहे. शनिवारी सकाळी सात वाजता ही घटना घडली. सुदैवाने पुलानजीकचा रस्ता खचताना आणि पुलाचा भाग पडताना कोणतेही लहान वाहन तेथून गेले नाही. अन्यथा दुर्घटना घडली असती.

नांगरवाडी ग्रामस्थांनी तातडीने साकवकोसळलेल्या ठिकाणी जाऊन रस्ता बंद केला आहे. ग्रामस्थांनी रेवदंडा पोलिसांना पाचारण केले होते. पोलिसांनी येऊन घटनास्थळी पाहणी केली आहे. सकाळपासून अजूनही हळूहळू या पुलाचा भाग आणि रस्त्याच्या साइडपट्टीची माती ढासळत असून, मोठा धोका निर्माण झाला आहे. •➤ पान २ वर




### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक दोन वर्षांत गाठणार

# १०,००० कोटींचा व्यवसाय टप्पा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ६४वी वार्षिक सर्वसाधारण सभा अलिबाग येथील बँकेच्या केंद्र कार्यालयात पार उत्साहात पडली. बँकेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ चे निकाल जाहीर करताना सांगितले की, बँकेस ८५.८० कोटी रुपये इतका ढोबळ नफा, तर ३५.५९ कोटी रुपये निव्वळ नफा मिळाला असून, सभासदांना १२.५ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. बँकेच्या स्वनिधीचा ७०० कोटी रुपयांचा टप्पा बँकेने पार केला आहे. पुढील दोन वर्षांत बँकेचा स्वनिधी १००० कोटी, तर बँकेचा व्यवसाय टप्पा दहा हजार कोटींपर्यंत नेणार, असे प्रतिपादन बँकेचे जयंत पाटील यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, बँकेचे विद्यमान संचालक, माजी संचालक द्वारकानाथ नाईक, बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, सहकारी सुरुवात जर्मनीतून झाली. आज संपूर्ण जगभरात हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे होत आहे, बँकेनेसुद्धा या आर्थिक वर्षात स्वनिधी आणि व्यवसाय याकरिता मिशन १००० कोटी आणि मिशन १०,००० कोटी अशी दोन ध्येय मिशन २०२८ म्हणून समोर ठेवलेली असून, त्याकरिता बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी •➤ पान २ वर




## आंदोलनाला तिसऱ्या दिवशीही परवानगी

**मुंबई :** मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासह इतर मागण्यांसाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे शुक्रवारी मुंबईत दाखल झाले. मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांना एका दिवसाच्या आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती. पोलिसांनी दुसऱ्या दिवशीही परवानगी दिली. आता उद्यासाठी म्हणजेच तिसऱ्या दिवशीही मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांना आझाद मैदानावर आंदोलनासाठी परवानगी दिली आहे.याबाबत आंदोलकांच्यावतीने रितसर आझाद मैदान पोलिसात अर्ज करण्यात आला होता.

दरम्यान, या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी मनोज जरांगे यांच्याशी चर्चा •➤ पान २ वर

# सुपली सोन्याची गं सुपली सोन्याची

■ **सुहासिनींकडून ओवशासाठी सुपांना मागणी**

■ **पोलादपुरातील चोळईमधील सुपांना पसंती**

**। पोलादपूर । शैलेश पालकर ।**

गौरीचे वाण सूप ही एक कोकणातील पारंपरिक प्रथा आहे. ज्यामध्ये गणेशोत्सवाच्या काळात गौरीची पूजा करताना सुवासिनी (सवाष्ण स्त्रिया) गौरीसमोर भरलेले सूप ठेवून ओवाळतात. नव्याने लग्न झालेल्या मुलीसाठी हे व्रत विशेष महत्त्वाचे मानले जाते. नवीन लग्न झालेली मुलगी आपल्या माहेरच्या गौरीला आणि मग सासरच्या गौरीला सूप ओवाळते. सोशल मीडियाच्या जमान्यात सुपली सोन्याची गं सुपली सोन्याची... या गाण्यावरील रिल्सने धुमाकूळ घातला आहे. मात्र, पोलादपूर तालुक्यातील चोळई बुरूडवस्तीतील विणलेल्या सुपांमधून आज हजारो माहेरवाशिणी सुहासिनींचा ओवसा पूजला जाणार आहे.

गौरीचे वाण असलेले सूप विणण्याची प्रथा कालबाह्य होऊ लागली आहे. मात्र, पोलादपूरलगतच्या चोळई गावातील बुरूड समाजाच्या लोकवस्तीमध्ये आजहीही सूप विणण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

बांबू लागवड करण्यासाठी कोकणात गेल्या काही वर्षांपासून उदासीनता असल्याने बुरूड समाजाच्या या व्यवसायाला कच्च्या मालाची कमतरता भासत होती. गौराईच्या •➤ पान २ वर



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

३१ऑगस्ट
१) श्री.गोपाळ अनंत भिडे
किहीम, अलिबाग, ३१-८-१९४७
२)श्रीम.सुप्रिया उल्हास बांदेकर
अलिबाग, अलिबाग ३१-८-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. नल्लरी कोटी बसवय्या, स्मरणार्थ अलिबाग**

# चणेरा-ऊसरमार्गे रोहा रस्ता रखडला

## ● डिसेंबरअखेर काम पूर्ण होणार : बागुल

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील चणेरा-ऊसरमार्गे रोहा हा महत्त्वाचा रस्ता गेली अनेक वर्षे रखडलेला असून, शासनाने २०२१ मध्ये मंजूर केलेल्या तब्बल पाच कोटी रुपयांच्या निधीनंतरही हा रस्ता अद्याप प्रवाशांना उपलब्ध झाला नव्हता. ऑक्टोबर २०२४ रोजी वर्क ऑर्डर संपल्यानंतरदेखील रस्ता खुला झाला नाही, यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप उसळला आहे.



या रस्त्यामुळे रोहा-चणेरा या १९ कि.मी.च्या अंतरात तब्बल १० कि.मी.ची बचत होणार असून, रोहा रेल्वे स्टेशनपासून अलिबाग, मुरुड, फणसाड अभयारण्य, काशिद बीच, रेवदंडा आणि साळावचे गणेश मंदिर ही पर्यटनस्थळे जवळ येणार आहेत. त्याचबरोबर चणेरा पंचक्रोशितील सुमारे ५० गावे रोह्याशी अधिक वेगाने जोडली जाणार आहेत. त्यामुळे या रस्त्याचे महत्त्व अधोरेखित होते.

शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिरंगाईवर संताप व्यक्त करत प्रकाश विचारे यांच्या नेतृत्वाखाली चणेरा येथे जोरदार आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात पंचक्रोशितील सुरेश मोरे, अनिल साळावकर, शंकर दिवकर, पराग घाग, समीर वारगुडे, मनोज भायतांडेल, अरुण खानविलकर, गोपाळ धारपवार, मजिद भुरे, गजानन साळवी, चंद्रकांत चौलकर, देवळे आदींसह शेकडो ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता.

यावेळी विचारे म्हणाले की, शासनाने दिलेला निधी वापरूनही आजवर काम रखडवण्यात आले आहे. ग्रामस्थांचा संयम संपत चालला आहे. जर डिसेंबर अखेरपर्यंत रस्ता पूर्ण झाला नाही, तर यापेक्षाही उग्र आंदोलन छेडले जाईल.आंदोलनाच्या दबावाखाली बांधकाम विभागाचे अभियंता विजय बागुल व अरुण पाटील यांनी डिसेंबर अखेरपर्यंत रस्ता डांबरीकरण करून पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यासोबतच त्यांनी लेखी स्वरूपात जाहीर घोषणा केली. त्यानंतरच आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

## निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता असून, आपल्या अन्य सहकारी सदस्यांना लोकप्रतिनिधित्व मिळावे यासाठी नगराध्यक्ष संजय कर्णिक, उपनगराध्यक्ष संजय दिवेकर यांनी पदाचा राजीनामा दिला असता रिक्त जागांवर पार पडणाऱ्या निवडणुकीत नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षपदासाठी नगरसेविका फरीन अ.अजीज बशारत आणि उपनगराध्य पदासाठी नगरसेविक अनिकेत पानसरे यांना संधी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुभाष केकाने यांच्या प्रमुख उपस्थितीत म्हसळा नगर पंचायत मुख्याधिकारी तथा निवडणूक पीठासन अधिकारी विठ्ठल राठोड यांच्याकडे नगराध्यक्ष पदासाठी फरीन अ.अजीज बशारत आणि उप नगराध्यक्ष पदासाठी अनिकेत उर्फ मुन्ना पानसरे यांनी आपले अर्ज दाखल केले आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षपदाची निवडणूक दि. १० सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे.



# उरणकरांची जीवघेणी कोंडी

## ● सिडकोचे पार्किंग प्लॉट रखडले
## ● कंटेनर-ट्रक रस्त्यावरच तंबू ठोकून

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात औद्योगिक विकासाच्या नावाखाली अवजड वाहनांचा मारा सुरू आहे. जेएनपीटी बंदरात माल उतरवल्यानंतर ट्रक-कंटेनर रस्त्यावरच डेरा टाकून बसतात. वाहतूक पोलीस रोज दंड ठोकतात, पण समस्या तशीच. कारण, सिडको प्रशासनाने राखून ठेवलेले पाच पार्किंग प्लॉट आजही कागदावरच आहेत.

मागील वर्षभरात तब्बल २२ हजारांवर वाहनचालकांवर कारवाई झाली, पण जनतेच्या हालअपेष्टा कमी झाल्या नाहीत. अनधिकृत कंटेनर यार्ड, ढाबे, भंगार गोदामं आणि सिडकोच्या ढिम्म धोरणामुळे उरणकरांचा श्वास गुदमरत आहे.

गणेशोत्सवात कोंडी होणार नाही, असं वाहतूक शाखेचं आश्वासन दिलं होतं; पण ते आश्वासन हवेत विरलं. आज जनता ट्रक-कंटेनरच्या जाळ्यात अडकून रोज कोंडीत जीव मुठीत धरून बसली आहे. सिडकोच्या दिरंगाईमुळे राखीव पार्किंग प्लॉट अजूनही नाल्यात आणि रस्त्यावर अवैध ट्रकचा ताबा याकडे सरकारी यंत्रणा डोळेझाक करून गप्प बसली आहे. उरणकरांचा संताप टोकाला पोहोचला असून, हा संताप जर रस्त्यावर फुटला, तर सिडको आणि प्रशासनाच्या गलथान कारभाराचा हिशोब जनता घेऊनच थांबणार, असा इशारा देण्यात आला आहे.

## समुद्रकिनारी शुकशुकाट



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड जंजिरा पर्यटनात ऑगस्टअखेरच्या विकेंडला शनिवारी मुरुड-काशिद बीचवर तुरळक प्रमाणात तर काही ठिकाणी शुकशुकाट दिसून येत होता. मुरुड-काशिद बीचवर पर्यटकांची मागील विकेंडला गर्दी पाहावयास मिळाली होती.गौरी गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर मुरुड आजूबाजूच्या परिसरात कोकणवासियांचा उत्साह दिसून येत आहे. गेल्या आठवड्यापासून अधूनमधून तर काही वेळा जोरदार वाऱ्यासह पडणाऱ्या पावसाचा परिणाम पर्यावरणावर दिसून येत असून, काही ठिकाणी शुकशुकाट दिसून येत होता. मुरुड समुद्रकिनाऱ्यावरील रुपेरी वाळू, निळाशार समुद्र, समुद्रामध्ये मध्यभागी असलेला पद्मदुर्ग, मुरुडला असणाऱ्या नारळी पोफळीच्या बागा यामुळे पर्यटक मुरुडकडे आकर्षित होत आहे. काशीद बीचवर असणारी रुपेरी वाळू, उंच उंच सुरुची झाडे त्यामुळे पर्यटक काशीद बीचला ही मोठ्या प्रमाणात भेट देत असतात. परंतु, ऑगस्ट अखेरच्या चौथ्या विकेंडला शनिवारी पर्यटनात मुरुड-काशिद बीचवर शुकशुकाट दिसून येत होता.



# मुरुडमध्ये खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

ऐन गणेशोत्सवात सतत पावासामुळे गणेशभक्त हैराण झाले होते. शनिवारी सकाळपासून वातावरणात बद्दल होऊन बऱ्याच दिवसांनी आकाशात सूर्याचे दर्शन झाले. दरम्यान, उन्हाचा तडाखा एवढा वाढला की, पारा २८ अंश सेल्सिअसवर पोहोचला. चांगले ऊन पडल्याने सकाळपासून भाविकांसह ग्राहकांनी बाजारपेठेत येऊन खरेदीसाठी गर्दी केली होती. गणेशोत्सवादरम्यान लागणाऱ्या वस्तू, फळे, फुले, भाजीपाला घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. उन्हाचा तडाखा वाढल्याने भक्तगणांमध्ये उत्साह दिसून आला.

## रस्त्याची दुरवस्था

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांच्या दुरवस्था झाली असून, ऐन गणेशोत्सवात वाहनचालकांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. अलिबाग-वडखळ मार्गावर अनेक ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले असून, रात्रीच्या सुमारास ते दिसून येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्याचप्रमाणे अलिबाग-रेवदंडा आणि अलिबाग-रोहा मार्गावरही खड्ड्यांचे साम्राज्य दिसून येत आहे. त्यामुळे वाहन चालकांना या मार्गावर वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे.

# रेवदंडा बायपास पुलाच्या कामामुळे नागरिक त्रस्त

## ● मनसेची सरपंच, पोलिसांकडे तक्रार

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा बायपास येथील नवीन पुलाचे काम आणि रस्त्याचे सर्व्हे क्षणाचे काम सुरू असले तरी त्या कामासाठी आवश्यक असणारे परवाना, मान्यता व कामगारांची नोंद शासनाकडून योग्यप्रकारे झाली नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रेवदंडा शहराध्यक्ष प्रशांत रामचंद्र वसोलकर यांनी ग्रामपंचायत सरपंच तसेच रेवदंडा पोलीस ठाण्याला लेखी निवेदन देऊन शासन व ठेकेदारांची कानउघाडणी केली आहे.

मनसेच्या निवेदनात नमूद केले आहे की, पुलाचे काम व रस्त्याचा सर्व्हे योग्य परवानगीशिवाय सुरू आहे. ठेकेदाराकडून कामगारांची माहिती व नोंद शासन व पोलिसांकडे देण्यात आलेली नाही. काम सुरू असताना अपघात अथवा अनुचित घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. मनसेने यावर जोरदार इशारा देत सांगितले की, परवानगीशिवाय व नोंदणीशिवाय कोणतेही काम सुरू होऊ नये. कामगारांची संपूर्ण माहिती पोलीस ठाण्यात देण्यात यावी, जेणेकरून कुठल्याही दुर्घटनेला स्थानिक नागरिकांना व प्रशासनाला सामोरे जावे लागू नये. शासनाला मनसेचा थेट सवाल रेवदंड्यासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी पूल आणि रस्त्याचे काम सुरू असूनही परवानगी व सुरक्षा उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत? शासनाकडून निष्काळजीपणामुळे स्थानिकांना धोक्यात टाकले जात नाही का? मनसेने दिलेल्या या निवेदनामुळे शासन व प्रशासनाची उपेक्षा व बेफिकिरी उघड झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला दुय्यम स्थान देऊन फक्त कंत्राटदार व काम पूर्ण करण्याची घाई केली जात असल्याचा सूर आता नागरिकांमध्ये उमटू लागला आहे.

# हॉटेल कर्मचाऱ्याच्या मृत्यूचे गूढ

**। पेण । प्रतिनिधी ।**

२० ऑगस्ट रोजी वाशीनाका येथील साई मराठा हॉटेलचा कर्मचारी हॉटेलच्या छतावरुन पडल्याची चर्चा सर्वत्र पेणमध्ये सुरु होती. मात्र, खरं काय हे समोर आलेच नाही. फक्त तर्क वितर्क सुरु होते. अखेर पेण पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर क्रमांक ४७/२०२५ चा डेली रिपोर्ट कृषीवलच्या हाती लागला असून, त्यात असलेली हकीकत आणि घडलेली बाब यामध्ये तफावत असल्याचे बोलले जात आहे. कारण खबर देणारे अमृत गावडे यांनी या घटनेतील मयत व्यक्ती रवींद्र भोसले हा बेशुध्द अवस्थेत रात्री ११ वाजता पडला असल्याचे सांगितले. परंतु, भ्रमणध्वनीवर अमृत गावडे याच्याशी संपर्क केला असता त्याचे पूर्ण नाव त्याला माहीत नसल्याचे सांगितले तसेच मालकांच्या सांगण्यावरन फिर्याद दिल्याचे ही सांगितले. प्रथमदर्शनी डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार यातील मयत व्यक्ती हा उंचावरुन पडून डोक्याला



मार लागल्याने मयत झाल्याचे म्हटले आहे, मग खबर देणार अमृत गावडे याने ही बाब का सांगितली नाही. तसेच दवाखान्यात आणण्याअगोदरच ही व्यक्ती मयत असल्याचे डॉक्टरांचेदेखील म्हणणे आहे. तसेच या हॉटेलचे मालक शरद पाटील असून, सदरचे हॉटेल हरिश शेट्टी आणि सतिश शेट्टी हे चालवत असल्याची माहिती भ्रमणध्वनीवरुन फिर्यादी अमृत गावडे याने कृषीवलशी बोलताना दिली. तसेच जर हॉटेलमध्ये रवींद्र भोसले वेटर अथवा कुक म्हणून काम करत असेल, तर पूर्ण माहिती मालकांना असणे गरजेचे होते. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि चव्हाण करीत आहेत.

# दस्तुरी नाक्यावरील ध्वनिक्षेपक बंद

## पर्यटकांमध्ये गोंधळाचे वातावरण

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावरून शहरात येण्यासाठी जी काही आवश्यक माहिती ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून देण्यात येत होती, ती काही दिवसांपासून बंद झाल्याने शहरात जाण्यासाठी वाहतुकीची कशाप्रकारे सुविधा उपलब्ध आहे, याबाबत पर्यटकांना माहिती मिळत नाही, त्यामुळे अनेकदा याठिकाणी पर्यटकांची दिशाभूल होत असल्याने दस्तुरी नाक्यावर माहिती फलक त्याचप्रमाणे कोणकोणती वाहतुकीची सुविधा आहे, याबाबत प्रशासनाने पुढाकार घेऊन पर्यटकांना अद्ययावत




माहिती मिळण्याची सोय करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

काही वर्षांपासून दस्तुरी नाक्यावर ज्याप्रकारे पर्यटकांची दिशाभूल होऊन त्यांना चुकीच्या पद्धतीने मार्गदर्शन केले जात होते, त्यामुळे या स्थळाची प्रतिमा दिवसेंदिवस मलिन झाली होती. याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होऊन याची प्रामुख्याने झळ ही स्थानिकांना, व्यापारी, दुकानदार यांना मोठया प्रमाणात सोसावी लागत होती. याकामी माथेरानप्रेमी नागरिकांनी पर्यटन बचाव संघर्ष समिती स्थापन करून दस्तुरी या ठिकाणी सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी संघर्ष केल्यानंतर दस्तुरी नाक्यावर ध्वनिक्षेपकाद्वारे विविध भाषांमधून माहिती देण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे पर्यटकांना आपल्या सोयीनुसार तेथील घोडा, हातरिक्षा, मिनिट्रेनची शटल सुविधा आणि ई-रिक्षाच्या माध्यमातून प्रवास करणे सोयीचे बनले होते. परंतु, ध्वनिक्षेपक बंद झाल्याने पर्यटकांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

पान १ वरुन

## १०,००० कोटींचा व्यवसाय टप्पा

मंदार वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामध्ये बँकेचा स्वनिधी १००० कोटी, तर बँकेचा व्यवसाय पुढील २ वर्षात १०,००० कोटींपर्यंत नेणार, असे प्रतिपादन बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. याकरिता बँकेने कृती आराखडा तयार केलेला असून, हे मिशन २०२८ बँक वेळेपूर्वी नक्कीच गाठणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बँकेच्या व्यवसायात झालेल्या प्रगतीबद्दल त्यांनी बँकेने मागील चार वर्षांत आपला व्यवसाय दुपटीने वाढविला आहे, याबाबत विस्तृत माहिती दिली. जुलै २०२५ अखेर बँकेने आपला हा व्यवसाय टप्पा ६६०० कोटींच्या पुढे नेलेला असून, चालू आर्थिक वर्षात बँकेचा व्यवसाय ७००० कोटी रुपयांचा टप्पा पार करेल व पुढील दोन वर्षांत १०,००० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडेल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक आणि त्यांच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी याबाबत केलेल्या उत्कृष्ट कामाचे कौतुक करत त्यांनी वर्तक यांचे अभिनंदन केले.

सभेच्या सुरूवातीला बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे यांनी बँकेला जाहीर झालेल्या पुरस्कारविषयी माहिती देताना बँकेला मिळालेले दोन राष्ट्रीय पुरस्कार आणि बँक असोसिएशन यांच्यावतीने मुख्य कार्यकारी मंदार वर्तक यांना मिळालेला बेस्ट सीईओ पुरस्कार याविषयी माहिती दिली. तर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी आपल्या सादरीकरणात बँकेने या आर्थिक वर्षात नाबार्ड अध्यक्ष के.व्ही. शाजी यांच्या उपस्थितीत केलेला ऐतिहासिक टप्पा म्हणून विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांचे संगणकीकरण प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी याबाबत उपस्थितांना माहिती दिली. ज्यामध्ये भारतातील पहिली सहकारी बँक म्हणून बँकेने सन्मान मिळविला आहे. हा प्रकल्प केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालय व नाबार्डचा महत्त्वाचा अजेंडा आहे. सोबतीला बँकेने गेल्या २० वर्षांपासून शून्य टक्के नेट एनपीए ही परंपरा यावर्षीही कायम राखण्यात आली आहे. शिवाय, बँकेच्या नवीन संगणक प्रणालीमुळे अधिक गतिमान सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असेही वर्तक यांनी सांगितले.

या सभेत जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट विविध कार्यकारी संस्थांचा सन्मान करण्यात आला. त्यात मापगाव-अलिबाग अध्यक्ष संदेश थळे, वशेणी-उरण अध्यक्ष प्रभाकर जोशी, खारआंबोळी-मुरुड अध्यक्ष तुकाराम पाटील, चणेरा- रोहा अध्यक्ष गोपीनाथ गंभे, म्हसळा अध्यक्ष विनायक गिजे व पाली-उपग्राम-सुधागड अध्यक्ष गजानन शिंदे यांचा गौरव करण्यात आला. तसेच गडकिल्ले संवर्धन व जतन करणाऱ्या अलिबागधील दुर्गरक्षक सामाजिक संस्था, खेलो इंडियामध्ये मार्शल आर्ट क्रीडा प्रकारात यश संपादन करणारी अलिबाग तालुक्यातील महाजने येथील श्रमिका श्रीधर पाटील, कमी वयात १५० गड किल्ले सर करणारी अलिबाग तालुक्यातील लोणारे येथील प्रसिद्ध गिर्यारोहिका शर्विका म्हात्रे आणि तिचे आई-वडील, गुंतवणुकीवर भर देऊन उद्योजकजगताचा उदयोन्मुख चेहरा अलिबाग तालुक्यातील नागाव येथील सागर नाईक, सेलिब्रिटींसह विविध नामवंत मंडळींची रांगोळी काढणारे महाड येथील चित्रकार तथा शिल्पकार निलेश निवाते, दुर्गम भागातील मुलांच्या शिक्षणावर भर देणारे पनवेल-सारसई येथील संतोष शिंगाडे, सहकार क्षेत्रात भरारी घेणाऱ्या रोहा तालुक्यातील कोलाड येथील नीलम कदम या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्यावतीने करण्यात आला.

## रोह्यात टेम्पोभर गुटखा जप्त

वर्षाव होत आहे. आरोपी रोशन सुभाष पैर (रा.चंद्रदर्शन रेसिडन्सी रोहा ) हा मध्यरात्री २.३० वाजताच्या सुमारास आपल्या ताब्यातील टेम्पो (क्र.एमएच ०६ बीजी ४५०५) नागोठणे बाजूकडून रोहा बाजूकडे घेऊन येत असताना हॉटेल रोहा प्राईड या ठिकाणी नाकाबंदी करित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना संशय आल्याने सदर वाहन चालकाला वाहन थांबविण्याचा इशारा केला असता त्याने वाहन न थांबविता बायपास रोडने वेगात वाहन चणेरा बाजूस घेऊन पळून गेला. त्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर पोलिसांनी त्यांचा पाठलाग करुन गाडी थांबवली. मध्यरात्री झालेल्या या थरारनाट्यानंतर गाडीत काय आहे? याबाबत पोलिसांकडून विचारपूस केली असता टेम्पो चालकाकडून असमाधानकारक उत्तर मिळत असल्याने पोलिसांनी गाडीचे पाठीमागील दरवाजे उघडून पाहिले असता टेम्पोत लाखो रुपयांचा बेकायदेशीर केसरयुक्त विमल पान मसाला, व्हीवन तंबाखू, तुलसी पान मसाला आढळून आला. या कारवाईत २ लाख ६४ हजार ३८० रुपयांचे साहित्य जप्त करुन टेम्पो चालकाला अटक केली.

रोहा पोलीस ठाण्यात २०२४ साली गुन्हा दाखल असलेला आरोपी रोशन पैर याच्याकडून जप्त केलेला बेकायदेशीर गुटख्याविषयी अधिक माहिती घेण्याचा पोलिसांनी प्रयत्न केले असता त्याने माहिती देण्यास टाळाटाळ केली. पोलिसी खाक्या दाखवताच चालकाने म्हसळा येथील सुनील कोकचा व नजीर मेमन या दोन मुख्य डीलरचे नाव सांगितले. त्यानंतर रोहा शहरातील पाच पानटपरी चालकांना हा बेकायदेशीर गुटखा पुरवठा केला जात असल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कस्टडी सुनावली असून, अलिबाग कारगृहात त्यांची रवानगी करण्यात आली. टेम्पो चालकासहित पाच पानटपरीधारकांना अटक केली असून, म्हसळा येथील दोन गुटखामाफिया अद्याप फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सलमान खतीब करीत आहेत.

## नांगरवाडीनजीक साकव कोसळला

यावरून एखादे चारचाकी वाहन गेले तर पूल पूर्णतः कोसळण्याची शक्यता आहे. हा छोटा साकव कोसळल्याने आता या रस्त्यावरून लहान चारचाकी आणि दुचाकी वाहनांची वर्दळ थांबणार असून, नागरिकांची गैरसोय होणार आहे. दरम्यान, रोहा रस्त्यावरील नवघर आणि सुडकोली येथील दोन पूल धोकादायक असल्याने यावरून अवजड वाहतूक बंद केली आहे. यामुळे नागरिकांची हेळसांड होत होती. आता नांगरवाडीनजीकचा पूल दुर्घटनाग्रस्त झाल्याने अन्य वाहतुकीला ब्रेक लागला आहे

## सुपली सोन्याची गं सुपली सोन्याची

वाणासाठी सूप, डालगे, टोपल्या, कणग्या तसेच अन्य बांबूपासून बनविण्यात आलेल्या बुरूड समाजाच्या परंपरागत हस्तकला कौशल्याच्या वस्तूंची जागा प्लास्टिक आणि फायबरच तकलादू आणि महागड्या वस्तूंनी घेतली. मात्र, अशा परिस्थितीतही पोलादपूर तालुक्यातील सडवली ग्रुपग्रामपंचायत सडवली अंतर्गत चोळई गावातील बुरूडवस्तीमध्ये योगिता एकनाथ गायकवाड या महिलेने माहेरापासून जोपासलेली बुरूडकामाची परंपरा नेटाने सासरीदेखील सुरू ठेवली. बांबूपासून सूप विणताना योगिता गायकवाड यांनी आधीपासूनच बांबूच्या पट्ट्यांना रंग देऊन आकर्षकपणा आणण्याचे कसब दाखवून सुपांचा आकर्षकपणा अधिकच खुलविला आहे. यामुळे या सुपांचे आकर्षण नवविवाहितेच्या माहेरी तसेच सासरीदेखील वाखणले जात आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील पहिले गाव असलेल्या चोळईमध्ये हस्तकला केंद्र निर्माण झाल्यास या सुपांना अधिकच मागणी वाढेल, असा विश्वास योगिता गायकवाड यांना वाटत आहे.

## रायगडात ड्रोन उडविण्यास बंदी

दहशतवादी आणि विघातक कारवायांसाठी ड्रोनचा वापर झाल्याची उदाहरणे आहेत. रायगडमध्ये रात्रीच्या वेळी अनधिकृत ड्रोन उडवल्याच्या तक्रारी पोलीसांकडे नोंदवल्या गेल्या असून, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ड्रोनद्वारे टेहळणी करून दहशतवादी हल्ले घडवून आणण्याची शक्यता, चोरी व अन्य गुन्ह्यांसाठी माहिती संकलन होण्याचा धोका, तसेच ड्रोनवरून केलेले चित्रिकरण विघातक कृत्यांसाठी वापरले जाण्याचा अंदाज लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांनी हे आदेश जारी केले आहेत. पुढील काळात कोणीही ड्रोनचा वापर करायचा असल्यास ७ दिवसांपूर्वी संबंधित पोलीस ठाण्यात अर्ज करून परवानगी घेणे बंधनकारक राहील. मात्र, या आदेशांच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा आगरकोट किल्ला, रेवदंडा बीच आणि रेवदंडासाळाव ब्रिज परिसरात अनधिकृतपणे ड्रोन उडवले जात असल्याचे गंभीर आरोप नागरिक, पर्यटक व शिवप्रेमींनी केले आहेत.

## नवविवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

बलकवडे, सासरे विलास महादेव बलकवडे, सासू मीना विलास बलकवडे आणि नणंद वैष्णवी विलास बलकवडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दि. २९ ऑगस्ट रोजी दुपारी ११ नंतर भाग्यश्री आपल्या ३.५ महिन्यांच्या बाळाला आंघोळ घालत होती. यावेळी पतीकडून चुकून बाळाच्या डोळ्यात पाणी गेले. यावरून झालेल्या तक्रारीतून वाद उभा राहिला. त्यावेळी सासूने समजूत घालून परिस्थिती नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भाग्यश्री सोडून सर्वजण बाहेर गेले होते. परंतु, काही वेळाने घरात दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केल्यानंतर आतून दरवाजा बंद असल्याचे समोर आले. दरवाजा तोडून पाहिल्यावर भाग्यश्रीने गळफास घेतल्याचे उघड झाले.याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कीरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय बाचकर करीत आहेत.

## आंदोलनाला तिसऱ्या दिवशीही परवानगी

करण्यासाठी सरकारतर्फे शिंदे समिती भेटण्यासाठी गेली आहे. यामध्ये जरांगे व शिष्टमंडळामध्ये चर्चा सुरु आहे. पण, समिती व जरांगे यांच्यातील चर्चेतून तोडगाच निघालेला नाही. सरकारने दिलेल्या प्रस्ताव जरांगे यांनी अमान्य केले असून, आंदोलन सुरुच ठेवण्याचे ठरविले आहे. यामुळे मराठा आरक्षण प्रश्न पुन्हा एकदा चिघळणार असल्याची चिन्हे दिसून येऊ लागली आहेत.

## निवडक

### गणेशोत्सवात फळांची मागणी वाढली

**पनवेल** : गणेशोत्सवात फळांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पनवेल घाऊक फळ बाजारात फळांची आवक ३० ते ४० टक्क्यांनी वाढली असून, त्यात सफरचंद, डाळिंब, संत्री, मोसंबी, पेरू, चिकू, सीताफळ, पेर आणि ड्रॅगनफ्रुटसारख्या फळांना अधिक मागणी आहे. या फळांचे दरही वधारले आहेत. मागणी असल्याने सध्या या फळांची आवक चार ते पाच हजार क्विंटलच्या घरात गेली आहे. घाऊक फळ बाजारात सध्या डाळिंब एक हजार क्विंटल, मोसंबी दीड हजार क्विंटल, तर संत्र्याची दोनशे ते तीनशे क्विंटल इतकी आवक, सीताफळांची दोनशे क्विंटल आवक होत आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून फळ बाजारातील वातावरण शांत होते, मात्र गणेशोत्सवामुळे बाजाराला काही प्रमाणात उभारी मिळाली आहे. ड्रॅगनफ्रुट ५० क्विंटल याशिवाय इतर पावसाळी फळे पेर, नासपती, सीताफळ या फळांचीही दोनशे ते तीनशे क्विंटल इतकी आवक आहे. बाजारात एकीकडे आवक वाढली असली, तरी दुसरीकडे फळांचे किरकोळ बाजारातील दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. देवाच्या दर्शनासाठी फळे घेऊन जाण्याची पद्धत आहे. त्यामुळे फळांना मागणी वाढली असल्याचे व्यापारी सांगत आहेत. यामुळे किरकोळ बाजारात मात्र या फळांचे दर वाढलेले पाहायला मिळत आहेत.



### गौरीसाठी बाजारपेठ सजली

**मुरुड जंजिरा** : गौरीच्या स्वागतासाठी घराघरात महिलांची लगबग सुरू झाली आहे. गौरी पूजन हा महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या सणांपैकी महत्त्वाचा सण आहे. भारतीय संस्कृती, परंपरांमध्ये तसेच समाजजीवनात गौरी हे शिवाच्या शक्तीचे आणि गणेशाच्या आईचे रूप मानले गेले आहे. अनेक ठिकाणी याला महालक्ष्मी पूजन असेही संबोधले जाते.गौरी पूजांसाठी लागणारे साहित्य घेण्यासाठी मुरुड बाजारपेठेत गर्दी झाली होती. गौरीचे वैशिष्ट्यपूर्ण मुखवटे, असंख्य प्रकारचे दागिने, साड्या आणि सजावट साहित्यांनी सजलेल्या बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी महिलांची दिवसभर वर्दळ दिसून आली. मुरुड शहरासह पंचक्रोशी भागात तेरड्याची गौर बघायला मिळते. भाद्रपद सप्तमीच्या दिवशी सायंकाळी महिला तेरड्याची रोपे मुळासकट काढून आणतात. गौरी इल्यो असे म्हणत त्यांचे स्वागत केले जाते. तेरड्याची मुळे म्हणजेच लक्ष्मीची पावले मानली जातात.



### कामगारांच्या वारसांना नियुक्ती

**खोपोली** : खोपोली नगर परिषदेत यापूर्वी मयत व निवृत्त झालेल्या तब्बल ११ सफाई कामगारांच्या वारसांना खोपोली नगरपरिषद प्रशासनाने वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती दिलेली आहे. यामुळे या वारसांच्या घरी यंदा गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा होणार आहे. नोकरीच्या रूपाने गणपतीबाप्पाच पावला अशी भावना नियुक्ती आदेश मिळालेल्या सफाई कामगारांनी व्यक्त केली. यासाठी खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी रणजित पवार, प्रशासकीय अधिकारी सोहन गुरव, लघुटंकलेखक प्रशांत कुलकर्णी व सहायक लखिमले यांनी विशेष मेहनत घेऊन विक्रमी वेळेत कामकाज पूर्ण केले.

### इमारतीत सापडली सापाची अंडी

**पनवेल** : पनवेल बस स्थानकाजवळील एका इमारतीत साप असल्याचे विक्रम कैया यांनी नेचर फ्रेण्ड सोसायटी या संस्थेचे कार्यकर्ते शार्दुल वारंगे यांना कळवले. मात्र या इमारतीत साप न सापडता, सापाची १४ अंडी आढळली. वनविभागाच्या मार्गदर्शनानुसार नेचर फ्रेण्ड सोसायटी या संस्थेच्या प्रथमोपचार व पुनर्वसन केंद्रात पुढील प्रक्रियेसाठी ही अंडी आणली. या अंड्यांतून १५ ते २३ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये धामण या सापाची ११ पिल्ले व्यवस्थित बाहेर आली. या पिल्लांना २५ ऑगस्ट २०२५ रोजी वनविभागच्या मार्गदर्शनानुसार संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे, कार्यकर्ते बाबू शेख, आर्यन उदरे व वनरक्षक अमोल लाड यांच्या समक्ष निसर्गात सोडून देण्यात आले. धामण साप बिनविषारी असून तो शेतकऱ्यांचा मित्र आहे. शेतीतील उंदीर, घुशी आणि इतर उपद्रवी प्राणी खाऊन पिकांचे संरक्षण करतो. या सापाच्या मदतीने शेतकरी प्राण्यांचा बंदोबस्त न करता पिकांचे नुकसान टाळू शकतात, त्यामुळे तो शेतीसाठी एक मौल्यवान सहयोगी आहे, असे नेचर फ्रेण्ड सोसायटी, पनवेलचे संतोष उदरे यांनी सांगितले.



### मुरुडमध्ये पावसाची जोरदार हजेरी

**आगरदांडा** : शहरांसह पंचक्रोशी भागात जोरदार पाऊसाने सुरुवात झाल्याने ऐन गणेशोत्सवात जनजीवन विस्कळीत झाले आसुन बाजारपेठ ठप्प झाले आहेत. दिवसभरात पाऊसाची नोंद ९१ मि.मि.आतापर्यंत २०७० मि.मी.टप्पा पार झाला आहे. या संदर्भातील माहिती मुरुड तहसीलदार कार्यालयातील संदेश वाळंज यांनी दिली. श्री गणेशोत्सवानिमित्त घरोघरी उदंड उत्साह आणि आनंदाचा वातावरण असतो. प्रत्येक गणेशभक्त आपल्या बाप्पासाठी खरेदी साठी बाहेर पडत असतो तर कोणी एकमेकांच्या घरी गणपती बघायला जात असतात.परंतु पावासामुळे आलेले चाकरमानी आणि स्थानिक अबालवृद्ध महिला-पुरुषांचा आणि तरुणांच्या उत्साहाला ब्रेक लावला आहे. सतत पावासामुळे शेतकरी सुखावला आसला तरी व्यावसायिक मात्र चिंतेत आहेत.

# श्रीवर्धन प्रशासकीय भवनात पाण्याची तऱ्हा

## • तळ मजल्यावर पाण्याचा थेंबही नाही



(संग्रहित छायाचित्र)

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवनात पाण्याची अजब तऱ्हा झाली आहे.पहिल्या मजल्यावरील उपविभागीय अधिकारी कार्यालयात मुबलक पाणी तर नऊ कार्यालये असलेल्या तळ मजल्यावर पाण्याचा एक थेंब ही नाही.याचा त्रास कार्यालयीन कर्मचाऱ्यांसह नागरिकांना होत आहे.

तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते मध्यवर्ती प्रशासकीय भवनाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. शासकीय कार्यालयांचे केंद्रीकरण झाल्याने कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची धावपळ कमी झाली. प्रशासकीय भवनाच्या आवारात बोअरवेल असल्याने इमारतीत पिण्यासाठी स्वच्छ पाणी, पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे यामुळे खेडेगावातून आलेल्या नागरिकांची गैरसोय होत नव्हती.

भवनाच्या आवारातील बोअरवेल मधून पहिल्या मजल्या साठी करण्यात आलेल्या टाक्यांमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थित होतोय तर तळमजल्यावर पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांमध्ये इमारतीचे उद्घाटन झाल्यावर काही वर्षांतच बोअरवेलमधून पाणीपुरवठा बंद करण्यात आला. सद्य परिस्थितीत पाण्याच्या टाक्या, जलवाहिन्या, नळ सुस्थितीत आहेत. परंतु, टाक्यांमध्ये एक थेंब पाणी नाही अशी अवस्था आहे.

पहिल्या मजल्यावर उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे महिला व पुरुषांसाठी असलेल्या प्रसाधनगृहात मुबलक पाणी असल्याने तळमजल्यावरील कार्यालयात कामानिमित्त आलेला नागरिक दोन जिन्यांची पायपीट करत पहिल्या मजल्यावर जातो. इमारतीच्या तळमजल्यावर नऊ कार्यालय आहेत. या कार्यालयात कामानिमित्त येणारे ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, विकलांग व्यक्ती हे नैसर्गिक विधी करीता पहिल्या मजल्यावर जाऊ शकत नसल्याने अशा नागरिकांची गैरसोय होते.

सद्यस्थितीत पाण्याअभावी तळमजल्यावरील पुरुष व महिलांच्या प्रसाधनगृहात पाण्याचा एकही थेंब येत नसल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे.

> “ टाक्यांची जलवाहिनी खंडित झाली असेल अथवा गळती लागली असल्यास त्याची दुरुस्ती करण्यात येईल.प्रसाधन गृहांची लवकरच स्वच्छता करण्यात येईल.परंतु प्रसाधनगृहांची स्वच्छता याबाबतीत तळमजल्यावरील नऊ कार्यालयांनी जबाबदारी घ्यायला हवी.या कार्यालयांनीही आळीपाळीने स्वच्छता कर्मचारी नेमायला हवा.
> – तुषार लुंगे.उपविभागीय अभियंता.क्र.०१.सार्वजनिक बांधकाम विभाग.श्रीवर्धन. ”

**प्रशासकीय भवनातील कार्यालये**

पहिल्या मजल्यावर उप विभागीय अधिकारी यांचे कार्यालय तर तळ मजल्यावर तहसीलदार यांचे दालन, पुरवठा शाखा, संजय गांधी योजना शाखा, अभिलेख कक्ष, मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय, निवडणूक शाखा, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय अशी नऊ कार्यालये आहेत.

## सरकत्या जिन्याचे काम कासवगतीने

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



मध्य रेल्वेवरील कर्जत दिशेकडे असलेल्या नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात फलाट एक वर स्थानकाच्या मध्यभागी सरकता जिना बसविला जात आहे. या सरकत्या जिन्याचे काम अगदी कासवगतीने सुरू असून स्थानकात एकही सरकता जिना उपलब्ध नसल्याने वयोवृद्ध प्रवासी यांचे हाल होत आहेत. दरम्यान नेरळ स्थानकात फलाट एकवर मुंबई दिशेकडे उभारण्यात आलेला सरकता जिना लोकार्पणाच्या प्रतीक्षेत असून रेल्वे प्रशासन कोणाची वाट पाहत आहे, असा सवाल उपस्थित केला आहे.

नेरळ जंक्शन स्थानकाचा मेकओव्हर मुंबई रेल कॉर्पोरेशन कडून सुरू आहे. मुंबई कडून उपनगरीय लोकल येत असलेल्या फलाट एक वर मुंबई एंड कडे सरकता जिना प्रवासी वर्गासाठी सोयीसाठी उभारण्यात आला आहे.या सरकता जिन्यावर एकाच वेळी प्रवासी वर्गाला स्थानकात उतरण्याची आणि स्थानकातून वर जाण्याची सुविधा आहे.मोठ्या प्रमाणावर पर्यटक नेरळ स्थानकातून माथेरान या पर्यटन स्थळी जाण्यासाठी येत असतात. त्यामुळे नेरळ स्थानकात सरकता जिना यापूर्वी होणे आवश्यक होते.मात्र आता हा सरकता जिना बांधून तयार आहे,परंतु तो सरकता जिना अद्याप कार्यान्वित झालेला नाही.

नेरळ स्थानकाच्या मध्यभागी मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून सरकता जिना उभारला जात आहे. या सरकता जिन्याच्या उभारणीचे काम अत्यंत कासवगतीने सुरू असून त्याबाबत नेरळ प्रवासी संघटना यांनी नाराजी व्यक्त केली आहे.नेरळसारख्या लोकसंख्या वाढीचा वेग प्रचंड असलेल्या मुंबईचे उपनगर म्हणून विकसित होत असलेल्या रेल्वे स्थानकात सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नसल्याने प्रवासी संघटना नाराज आहे.त्यामुळे मुंबई रेल कॉर्पोरेशनकडून सुरू असलेल्या या कामाबद्दल खासदार श्रीरंग बारणे यांनी पुढाकार घ्यावा आणि स्थानकात सुरू असलेली विकास कामे तातडीने मार्गी लावावी अशी मागणी होत आहे.

## जनरेटरची चोरी

**। पनवेल । प्रतिनिधी।**

पनवेल शहराजवळील मुंबई-गोवा हायवे रोडच्या कडेला अन्नपूर्णा हॉटेलसमोर उभ्या केलेल्या ट्रकच्या केबिनमध्ये लोखंडी ग्रीलमध्ये लॉककरून ठेवलेले जनरेटर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. २५ हजार रुपये किमतीचा होंडा कंपनीचा लाल रंगाचा जनरेटर उभ्या केलेल्या ट्रकच्या केबिनमध्ये ग्रीलमध्ये लॉककरून ठेवलेले असताना अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

## गौरीला ओवसा देण्यासाठी सुपांना मागणी वाढली

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गणरायापाठोपाठ येणाऱ्या गौरीला ओवसा देण्यासाठी पारंपरिक सुपांना मागणी वाढलेली दिसते. बांबूपासून बनवलेले सूप भाऊ हा गौरी गणपतीत बहिणीसाठी नेतो आणि बहीण त्याचा पाहुणचार करते, तर काही ठिकाणी नवीन नवरीला पाच सुपांचा ओवसा देण्याची पद्धत रूढ आहे.

सुपात फळे, वेगवेगळी फुले, दुर्वा, तुळस, आघाडा, पोळ्या, करंजी आदी साहित्याचा ओवसा गौरीला दिला जातो. या वेळी भाऊ बहिणीला साडीचोळी, बांगडीसाठी पैसे देतो. मग साजशृंगार, सौभाग्याचे लेणे परिधान करून महिला पतीच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करून गौरीची ओटी भरतात. येत्या रविवारी गौरीचे आगमन व सोमवारी पूजन असल्याने बाजारात सुपांना मागणी आहे. बुरूड समाजाच्या वतीने गौरी पूजनासाठी सूप बनविले जातात. उत्सवापूर्वी सूप बनविण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली जाते. बाजारात बांबूपासून बनविण्यात येत असलेल्या सुपाचा १५० ते २०० रुपये असा दर आहे.

## शिलेदारांची कुणबी युवा मुंबई मंडळावर निवड

**। मुंबई । वार्ताहर ।**



कुणबी समाजोन्नती संघ मुंबईच्या कुणबी युवा मुंबईच्या पंचवार्षिक निवडणूक नुकतीच कुणबी ज्ञाती गृह वाघे हॉल, परळ येथे पार पाडली.

या निवडणुकीमध्ये महाड तालुक्यातील बेबलघर गावचे मिलिंद चिबडे यांची कुणबी युवा मुंबईच्या उपाध्यक्षपदी, तर गोठे गावचे ॲड.विशाल गोलाबडे यांची कुणबी कायदेविषय सल्लागार समितीवर निवड करण्यात आली तर कुणबी युवा ब्रिगेड प्रमुखपदी चिंभावे गावचे योगेश मालप, कुणबी युवा ब्रिगेड सचिवपदी जुई गावचे विशाल देवळे, कुणबी युवा मुंबईच्या प्रचारक पदी दाभोळ गावचे अशोक आंबेकर यांची नियुक्ती करण्यात आली.

कुणबी युवा मुंबई मध्यवर्ती कार्यालयातून नियुक्ती झालेल्या महाड येथील शिलेदाराचे कुणबी युवा मुंबई मध्यवर्ती कार्यालय, तसेच कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा महाड पोलादपूर संलग्न महिला मंडळ युवक मंडळ, बहुजन समाज मित्र परिवारसह विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकासह अभिनंदन, शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

प्रामुख्याने चार जिल्ह्याचे कार्यक्षेत्र असलेला कुणबी युवा मुंबईचे कार्य असून, प्रबोधन विचारांना बळकटी देण्याकरिता ही नियुक्ती महत्वाची मानली जाते. युवा शिलेदारांसाठी ही एक महत्त्वाची जबाबदारी आहे.

## किसान क्रांती संघटनेचे नवीन पदाधिकारी निवड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



किसान क्रांती संघटनेच्या रायगड जिल्ह्याच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. किसान क्रांती संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून उत्तम शेळके यांची तर जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून रामदास माळी तर कर्जत तालुका अध्यक्ष म्हणून भरत राणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

किसान क्रांती संघटना राज्यभरात शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी काम करीत असून शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळवून देण्यापासून शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्याचे काम ही संघटना सातत्याने करीत असते. रायगड जिल्ह्यात गेली सहा वर्षे ही संघटना कार्यरत असून रायगड जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी बनविण्यासाठी कर्जत येथे संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून उत्तम शेळके यांच्यावर पुन्हा एकदा जबाबदारी देण्यात आली आहे. नवीन जिल्हा कार्यकारिणीत जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून रामदास माळी यांची तर जिल्हा संघटक म्हणून रमाकांत जाधव तर महाराष्ट्र राज्य संघटक म्हणून विनायक पाटील यांची निवड झाली आहे.कर्जत तालुका अध्यक्ष भरत राणे, सल्लागार काशिनाथ धुळे, सचिव एकनाथ शेळके, तालुका खजिनदार म्हणून रवींद्र जाधव, प्रवक्ते म्हणून सुरेश खानविलकर,तालुका सदस्य म्हणून मधुकर मरवडे, सागर जामघरे, परशुराम मोरे, उमेश तुपे आणि निलेश विरले यांचा समावेश आहे.

## मोटारसायकलची चोरी

**पनवेल** : पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. धनंजय पांढरकर यांनी त्यांची १५ हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची निळ्या रंगाची डिस्कवर मोटारसायकल क्रमांक एमएच ०२ बीई २२१६ हि : पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

## ऐन गणेशोत्सवात पावसाचे थैमान



**। तळा । वार्ताहर।**

तळा तालुक्यात ऐन गणेशोत्सवात पावसाने थैमान घातले असून गणेशोत्सवासाठी आलेल्या चाकरमान्यांची पावसामुळे चांगलीच तारांबळ उडाली असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवासाठी चाकरमानी मोठ्या प्रमाणावर आपल्या गावी परतले आहेत.नेहमी ओस पडलेली गावे माणसांनी पूर्णतः भरून गेली असल्याचे चित्र सध्या गावोगावी पाहायला मिळत आहे. मात्र ऐन गणेशोत्सवात सुरुवातीपासूनच पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची चांगलीच गैरसोय होत आहे.ऐन सणासुदीच्या काळात कोसळत असलेल्या पावसामुळे व्यापारावर परिणाम झाला आहे.

## आठवड्या बाजारावर नियंत्रणशून्य

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महानगरपालिकेने दोन महिनेपूर्वी कायमस्वरूपी बंदी घातलेल्या आठवड्याच्या बाजारावर कारवाई होणार असल्याचं सांगितलं होतं. मात्र प्रत्यक्षात नवीन पनवेल मध्य रेल्वे कोकण मार्गाच्या बाजूला आजही मोठ्या प्रमाणावर आठवड्याचा बाजार भरतो आहे.या आठवडा बाजाररात व्यवसाय करणारे बाहेरून येत असतात त्या मध्ये अनेकांची पाकीट तर महिला वर्ग दागिने गर्दी गेले आहे नागरिकांच्या मते, पालिकेचे आदेश केवळ कागदावरच मर्यादित राहिले आहेत. या बाजारात खांदा वसाहत व आजूबाजूच्या महिला रेल्वे रुळ ओलांडून जीव धोक्यात घालून खरेदीसाठी येतात. याच ठिकाणी अनेकांचा रेल्वेखाली प्राण गेलेला असतानाही परिस्थिती बदललेली नाही. मालगाड्या व बाहेर जाणाऱ्या गाड्यांचा प्रचंड वेग असताना ही धोकादायक प्रवास सुरूच आहे.

## पावसाळ्यात खूप आवडीने खाल्ली जाणारी ‘अळंबी’

**। आगरदांडा । प्रतिनिधी।**

पावसाळ्यात खूप आवडीने खाल्ली जाणारी अळंबी ही लोकप्रिय रानभाजी आहे. पावसाळ्यात साधारण श्रावण महिन्यातील पुष्प नक्षत्रात टपोऱ्या थेंबांच्या पावसात ही अळंबी उगवतात.

मोकळ्या रानात उगवलेली अळंबी गोळा करण्यासाठी जंगलाचा परिसर पायी तुडवावा लागतो. काही ठिकाणी वारुळावरही अशी खूप अळंबी येतात. एकदा उगवण्यास सुरुवात झालेली अळंबी आठवडाभर उगवत राहतात. अळंबी शोधण्यासाठी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी रानात जावे लागते. सकाळी लवकर टोपीसारखीही अळंबी आदिवासी महिला बाजारपेठेत विक्री साठी घेऊन येतात. लोक ही भाजी आठवणी खातात. या अळंबी भाजीला चांगला दर मिळतो.

## अमूल बटरची चोरी

**। पनवेल । वार्ताहर।**

कोल्डस्टार वेअरहाऊस, खेरणे येथील शितगृहातून चार लाख ४२ हजार रुपये किमतीचे अमूल बटरची चोरी केल्याप्रकरणी चौघाविरोधात २५ ऑगस्ट रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अमूल बटर चोरीच्या गुन्ह्यातील तिघांना पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे. कोल्डस्टार वेअरहाऊस, खेरणे येथील शितगृहातून चार अनोळखी इसमानी साडेसातशे किलो अमूल कंपनीचे बटर चोरून नेले. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पनवेल तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यानुसार पोलिसांनी आपला तपास वळविला. सखघेल तपासात पोलिसांनी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आणखी आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

**सागाव आदिवासीवाडीमधील नुकसानग्रस्तांना आर्थिक आधार**

## शेकापकडून मदतीचा हात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



अतिवृष्टीमुळे सागाव आदीवासीवाडी येथे अनेक घरांचे नुकसान झाले होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने येथील नुकसानग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला. शेकापच्या काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या हस्ते नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत करण्यात आली. नुकसानग्रस्तांना शासनाकडून अद्याप मदत मिळाली नाही. परंतु शेकापने सामाजिक बांधिलकी जपत मदत केल्याने नुकसानग्रस्तांनी समाधान व्यक्त केले.

जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील अनेक घरांची पडझड झाली होती. अलिबाग तालुक्यातील सागाव आदिवासीवाडीमधील अनेकांच्या घरांचे पत्रे उडाल्याने घराचे नुकसान झाले होते. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी घटनास्थळी जाऊन नुकसानग्रस्तांची भेट घेतली. त्यांची विचारपूस करून नुकसानीची पाहणी केली. परंतु शासनाकडून वेळेवर मदत मिळाली नाही.

त्यामुळे शासनाच्या एक पाऊल पुढे टाकत शेतकरी कामगार पक्षाच्या मार्फत आर्थिक मदतीचा हात नुकसानग्रस्तांना देण्यात आला. सागाव आदिवासीवाडी येथील संतोष वाघमारे यांना शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्याकडून आर्थिक मदत देण्यात आली. अलिबाग तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव नरेश गोंधळी, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष विलास वालेकर, शेकाप तालुका कामगार आघाडीचे सदस्य विनोद पाटील आदी शेकाप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या हस्ते आर्थिक मदत नुकसानग्रस्तांना देण्यात आली. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी आर्थिक आधार दिल्याने नुकसानग्रस्तांनी समाधान व्यक्त केले.

# गेटवे-मांडवा फेरीबोटीची प्रतीक्षा

## ● खराब हवामानाचा अडथळा ● जलप्रवाशांची गैरसोय

। रायगड । प्रतिनिधी ।

सर्वत्र मुसळधार पाऊस पडत असून समुद्राला उधाण आले आहे. लाटांचीही उंची कमी झालेली नसून वाऱ्याचा वेगही सर्वाधिक आहे. यामुळे गेटवे मांडवा फेरीबोट सेवा १ सप्टेंबरपासून सुरू होण्यास अनिश्चितता निर्माण झाली आहे. हवामान विभागाने पुढील तीन दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे, त्यामुळे ओहोटीची स्थिति पाहूनच फेरीबोट सुरू करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे.

तीन महिन्यांच्या मॉन्सूनबंदीनंतर गेटवे- मांडवा जलवाहतूक १ सप्टेंबरला सुरू होणार आहे. या मार्गावर फेरीबोट सेवा देणाऱ्या कंपन्यांनीही आपली सज्जता पूर्ण केली असून हवामान शांत होण्याची ते वाट पाहत आहेत. तितकीच प्रतीक्षा गौरी-गणपतीसाठी अलिबाग-



मुरूडकडे येणारे कोकणवासी करीत आहेत. त्यांचा हा सर्वात आवडीचा मार्ग असला तरी बिघडलेल्या हवामानामुळे त्यांचा प्रवास सुरू होण्यास विलंब होण्याची शक्यता आहे.

सप्टेंबरच्या १ तारखेला ही फेरीबोट सुरू होते. त्यामुळे गौरी-गणपतीचा प्रवास सुखरूप करता येतो. यंदा गणपती उत्सव लवकर आल्याने जलप्रवास करीत गौरी-गणपतीसाठी गावाकडे येणाऱ्यांची संधी हुकली आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाचे प्रमाण कमी होऊन फेरीबोट निर्धारित वेळापत्रकानुसार सुरू होईल, असा अंदाज जलवाहतूक संस्थांचा आहे. शनिवारी रात्रीची आणि रविवार दुपारच्या भरतीची स्थिती लक्षात घेऊन फेरीबोट सुरू करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे.

> १ सप्टेंबरपासून गेटवे ते मांडवा फेरीबोट सुरू करण्यास मेरिटाइम बोर्डाने अनुमती दिलेली आहे. यादरम्यान हवाम ान शांत होणे गरजेचे आहे. सध्याची स्थिती पाहता फेरीबोट सेवा सुरू करणे प्रवाशांसाठी धोक्याचे होऊ शकते. भरतीची स्थिती पाहिल्यानंतर समुद्र किती खवळलेला आहे, हे समजू शकते. त्याचबरोबर समुद्रात वाऱ्यांचा वेग आणि पडणाऱ्या मुसळधार पावसाचा अंदाज घेऊनच फेरीबोट सुरू केली जाईल.
>
> – आशीष मानकर, बंदर निरीक्षक, मांडवा.

### अपघात टाळण्यासाठी खबरदारी

मॉन्सून सुरू होण्यापूर्वी गेटवे ऑफ इंडिया ते मांडवापर्यंतची फेरीबोट सेवा बंद होते. मेरिटाइम बोर्डाने १ सप्टेंबरपासून या मार्गावरील फेरीबोट सुरू करण्यास अनुमती दिली आहे. अजंठा, मालदार, पीएनपी या वाहतूक संस्थांनी आपल्या फेरीबोटी सज्ज ठेवल्या आहेत. मागील वर्षी घारापुरी बेटाकडे जाणाऱ्या एका प्रवासी बोटीला झालेल्या दुर्घटनेनंतर मेरिटाइम बोर्डाने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी काही कडक अटी घालून दिल्या आहेत. त्या अटींची पूर्तता आणि बोटींची दुरुस्ती करूनच फेरीबोट चालवण्यास अनुमती देण्यात येते.

गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा हा लोकप्रिय मार्ग आहे. या मार्गावर दररोज हजारो पर्यटक आणि नागरिक प्रवास करीत असतात.

# लोकशाही दिन १ सप्टेंबरला

। रायगड । प्रतिनिधी ।

महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने सप्टेंबरमधील जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवारी (दि. १) दुपारी एक वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे होणार आहे. नागरिकांच्या तक्रारी, मागण्या तसेच प्रलंबित विषयांचा निपटारा करण्यात येणार असून संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# श्रीवर्धन आगारातर्फे परतीच्या प्रवासाचे चोख नियोजन

। श्रीवर्धन शहर । वार्ताहर।

गौरी गणपती,शिमगा हे कोकणातील मोठे सण. या सणांना मुंबई व अन्य ठिकाणांहून लाखो गणेश भक्त-नागरिक कोकणातील आपापल्या गावी येत असतात. त्यांना मुंबईहून कोकणात येण्यासाठी व सण झाल्यावर मुंबईला परत जाण्यासाठी एसटी बस हे वाहतुकीचे मोठे व प्रमुख साधन असते.

या गर्दीसाठी परतीच्या प्रवासासाठी एसटी आगारांना मोठ्या प्रमाणात जादा गाड्यांची चोख व्यवस्था करावी लागते. श्रीवर्धन आगारातून अशी व्यवस्था करण्यात आली आहे.ही व्यवस्था दि.२, ३ व ४ सप्टेंबर २५ या दिवसांसाठी करण्यात आली आहे. त्यात दि. २ रोजी बागमांडला-मुंबई, श्रीवर्धन-बोर्ली-नालासोपारा व श्रीवर्धन-बोर्ली -बोरीवली अशी जादा गाड्यांची व्यवस्था करण्यात आली असून जादा गाड्यांची सर्वाधिक व्यवस्था ३ सप्टेंबर साठी करण्यात आली आहे. दि. ३ रोजी श्रीवर्धन-बोर्ली-नालासोपारा या मार्गावर सर्वाधिक ज्यादा गाड्या सोडण्यात येणार असून त्याचे आरक्षणही सुरु झाले आहे. याशिवाय दि.३ रोजी बागमांडला- मुंबई, श्रीवर्धन-मुंबई, श्रीवर्धन-बोर्ली-बोरिवली, श्रीवर्धन-ठाणे या ज्यादा गाड्याही सोडण्यात येणार आहेत. दि. ४ सप्टेंबर रोजी श्रीवर्धन-बोर्ली-भांडुप, श्रीवर्धन-बोर्ली-नालासोपारा, श्रीवर्धन-बोर्ली-बोरिवली, श्रीवर्धन-बोरीवली, श्रीवर्धन-मुंबई या मार्गांवर गाड्या सोडण्यात येणार आहेत.

# चार हजार मराठा उपनगरीय लोकलने मुंबईत दाखल

। नेरळ । प्रतिनिधी ।

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनासाठी कर्जत तालुक्यातून तब्बल चार हजार मराठा आंदोलक मुंबईत पोहचले आहेत. उपनगरीय लोकलने ही सर्व मराठा आंदोलक मुंबईत पोहचले असून मुंबईत सर्व आजचा दिवस मुंबईत ठाण मांडून बसणार आहेत.

मराठा आरक्षण मिळविण्यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला आहे.या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून सकल मराठा समाजाचे आंदोलक मुंबईकडे निघाले आहेत. मुंबई शहरात



मराठा आंदोलक पोहचले असून कर्जत तालुक्यातून तब्बल चार हजार मराठा आंदोलक मुंबईत पोहचले आहेत. त्यात बहुसंख्य आंदोलक हे राज्य समन्वयक यांच्या सूचनेनुसार उपनगरीय लोकलने मुंबईत पोहचले आहेत. मुंबईसाठी कर्जत सकल मराठा समाज यांनी नियोजन केल्यानुसार सकाळी आठ वाजता मुंबईकडे जाणारी लोकल पकडून निघणार होते.मात्र त्याआधी शेकडो मराठा आंदोलक हे मुंबईकडे रवाना झाले होते. मराठा समाजाच्या वतीने सर्व मराठा आंदोलक हे मुंबईकडे पहाटेपासून उपनगरीय लोकलच्या मदतीने पोहचले आहेत. सकाळच्या वेळी मुंबईत धडकलेले कर्जत तालुक्यातील मराठा आंदोलक यांना आझाद मैदानात जाण्याची संधीदेखील मिळाली आहे. आठ वाजता मुंबईसाठी निघणारे मराठा आंदोलक यांना मात्र आझाद मैदानात उपोषण स्थळी जाण्यात अडचणी आल्या. परंतु कर्जत येथील किमान २०० महिला उपोषणासाठी मुंबईत पोहचल्या असून त्यांना आझाद मैदानात जाण्याची संधी मिळाली आहे. त्यानंतर दिवसभर जे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाची वाट पाहत होते. शासनाने वेळ वाढवून देण्याची निर्णय घेतल्यावर कर्जत तालुक्यातील मराठा समाजाच्या आंदोलक यांनी देखील आजचा मुक्काम मुंबईत करण्याचा निर्णय घेतला आहे.कर्जत तालुक्यात हजारो पुरुष मराठा आंदोलक मुंबईत थांबणार आहेत.



# खांदा वसाहत फूटपाथ धोक्यात

। पनवेल । वार्ताहर।

पनवेल खांदा वसाहत सेक्टर ९ समोरील फूटपाथ कोणत्याही क्षणी खचेल अशी शक्यता नागरिकांनी वर्तवली आहे. या फूटपाथच्या बाजूलाच असलेला मोठा नाला मुसळधार पावसामुळे प्रचंड वेगाने वाहत आहे. पाण्याचा जोर एवढा वाढला आहे की, फूटपाथखालील माती पूर्णपणे वाहून गेली असून फक्त काँक्रिटचा थर हवेत लोंबकळत आहे. दररोज शेकडो नागरिक या फूटपाथवरून ये-जा करतात. लहान मुलं, महिला आणि ज्येष्ठ नागरिक या मार्गाचा वापर करत असतात. मात्र आता कोणत्याही क्षणी फूटपाथ खचल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या फूटपाथचे काम ठेकेदाराने अर्धवट सोडून गेला अशी माहिती मिळत आहे? काही महिन्यांपूर्वी येथे दुरुस्तीची कामे सुरू झाली होती; पण ती पूर्ण होण्याआधीच ठेकेदार कामगारांसह निघून गेला. परिणामी पावसाळ्यात या फूटपाथची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.

# गुन्ह्यांचा तपास होणार अधिक जलद

। रायगड । प्रतिनिधी ।

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ लागू झाल्यामुळे आता पोलिसांना गुन्ह्यांच्या तपासासाठी तांत्रिक पुराव्यांवर अधिक भर देता येणार आहे. या नवीन नियमांमुळे रायगड जिल्ह्याच्या पोलिस दलात एक अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली आहे. यामुळे आता जिल्ह्यात घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांचा तपास अधिक जलद आणि तांत्रिक पद्धतीने पूर्ण करणे शक्य होणार आहे.

या व्हॅनमध्ये भौतिक, रासायनिक, जैविक आणि डिजिटल पुरावे गोळा करण्यासाठी अद्ययावत साधने आणि किट्स उपलब्ध आहेत. तसेच, यासाठी खास प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची एक टीम नियुक्त करण्यात आली आहे. या टीममध्ये चार असिस्टंट केमिकल ॲनालायझर, दोन वैज्ञानिक असिस्टंट आणि व्हॅनचालक यांचा समावेश आहे. या फॉरेन्सिक व्हॅनचे नुकतेच परीक्षण केले आहे.

> जिल्ह्यात आधी फॉरेन्सिक व्हॅन होती; मात्र आता आलेली व्हॅन ही अत्याधुनिक आहे. यामध्ये नॉटिक्स, सॅंपल कलेक्शन, केले जाणार आहे. ऑनलाइन पद्धतीने अपडेट आहे. त्यामुळे फॉरेन्सिक व्हॅनचा उपयोग गंभीर गुन्ह्याचा तपास लावण्यासाठी होणार आहे.
>
> आंचल दलाल, जिल्हा पोलीस अधीक्षक

# शालार्थच्या कागदपत्रांसाठी मुदतवाढ

## ● नवी कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडीबाबतची कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार आता १५ सप्टेंबरपर्यंत संबंधित कागदपत्रे सादर करता येणार आहेत.

नागपूर विभागात बोगस शालार्थ आयडीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीबाबत नवी कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यात शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतांची २०१२ ते २०२५ या काळातील कागदपत्रे शालार्थ संकेतस्थळावर ३१ ऑगस्टपर्यंत अपलोड करणे, शालार्थ आयडीसाठी ई ऑफिस प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले. तसेच वैयक्तिक मान्यतेमध्ये अनियमितता असल्यास फौजदारी कारवाईचे निर्देशही देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील शासकीय, अनुदानित शाळांतील शिक्षकांना कागदपत्रांची जमवाजमव करावी लागत आहे. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने कागदपत्रांच्या अनुपलब्धतेसह विविध तांत्रिक अडचणी निदर्शनास आणून देत मुदतवाढीची मागणी केली होती.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी शालार्थ कागदपत्रे अपलोड करण्याबाबत विभागीय मंडळांचे अध्यक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक, वेतन अधीक्षक यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश, वैयक्तिक मान्यता, रुजू अहवाल, शालार्थ मान्यतेचे आदेश इत्यादी कागदपत्रे शालार्थ प्रणालीमध्ये अपलोड करण्याच्या सूचना १६ जुलैच्या पत्राद्वारे देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत खासगी शाळांतील ४५ टक्के कामकाज पूर्ण झाले आहे.

कागदपत्रे अपलोड करण्यास ३१ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या ऐवजी १५ सप्टेंबरपर्यंत डीडीओ-१ आणि मुख्याध्यापक यांच्याच लॉगीनमधून कागदपत्रे अपलोड करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. कागदपत्रे अपलोड करण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# माकडाला रेस्क्यू करून दिले सोडून

**नवीन पनवेल :** रहिवाशी भागात उपद्रव करणाऱ्या माकडाला एन जे रेस्क्यू टीम आणि वनविभाग पनवेल यांनी रेस्क्यू करून सुखरूपपणे जंगलात सोडून दिले आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्टच्या बाजूला चिंचपाडा येथील एका इमारतीमध्ये माकड शिरल्याची माहिती आरएफओ गजानन पानपट्टे आणि वनरक्षक जगदीश यांना माहिती देण्यात आली. गेले पाच दिवस हा माकड येथे त्रास देत होता. यावेळी एन जे रेस्क्यू टीमचे नितेश जाधव यांनी आपली टीम पाठवली. राजेश ठाकूर, सौरव म्हात्रे, प्रदीप गाडे, सचिन कुलकर्णी, रितिक सावंत, अश्विन भगत या टीमने आणि वन विभागाने या माकडाला एका तासात रेस्क्यू केले, त्यामुळे इमारतीच्या रहिवासींनी एनजे टीमचे आभार मानले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे चेवणे, ता.कर्जत, जि.रायगड

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २२/२/ब/२ | एकूण क्षेत्र २-३२-०० हे.आर. | १.५९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- ३१/०८/२०२५
ठिकाण :- पनवेल
अॅड. रोहित रो. मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१,
कल्पतरु कॉम्प्लेक्स,सेक्टर ०९ खांदा कॉलनी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे शिंगढोळ, ता.कर्जत, जि.रायगड

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३४/३/अ | एकूण क्षेत्र १-५२-८० हे.आर. | ०.६६ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- ३१/०८/२०२५
ठिकाण :- पनवेल
अॅड. रोहित रो. मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१,
कल्पतरु कॉम्प्लेक्स,सेक्टर ०९ खांदा कॉलनी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक काशिनाथ मोतीराम घारे यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६० | १ | ०-२६-८० | ०-६६ |

सबब, सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ह्या निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०१/०९/२०२५
अॅड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि.रायगड-४१०२०१.

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
### जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक हक्कनोंद/अपील क्र.१६४/२०२५

१ श्री रविन्द्र सहदेव हेदुकर
रा. कापोली, पो.बोर्ली पंचतन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१ श्री.वसंत नारायण मयेकर
रा. ए-३०३, पी एल १३७ से १४०, सेक्टर ४.
शिवपार्वती अपार्टमेंट, नवीन पनवेल, नवी मुंबई - ४१०२०६
२ श्री.रमाकांत नारायण मयेकर
रा.पोमन निवास, पहिला मजला, रुम नं.४३, पहिली क्रॉस लेन,
नामजोशी मार्ग, भायखळा, स्टेशन जवळ, भायखळा प, मुंबई - ४०००११
३ रुक्मिणी कृष्णा मयेकर मयत तर्फे वारस
३/१ श्री.कमल अविनाश सातनाक
रा.२८५, चिंचादेवी रोड, बोर्ली पंचतन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
३/२ श्रीम.मंदा चंद्रकांत गवाणकर
रा.ब्राम्हणगाव, किशोर, ता.मुरबाड, जि. ठाणे - ४२१४०१
३/३ श्रीम. सायली संतोष मोहिते — उत्तराधी
रा.दांडा, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
३/४ श्रीम.लतिका कमलाकर पाटील मयत तर्फे वारस
३/४/१ श्री.कल्पेश कमलाकर पाटील
रा.डोंगरी, ता. मुरुड, जि. रायगड
४ श्री.दत्तात्रेय नारायण मयेकर मयत तर्फे वारस
४/१ श्रीम.निलिमा दत्तात्रेय मयेकर
४/२ श्री.मनोज दत्तात्रेय मयेकर
४/३ श्री.राजेश दत्तात्रेय मयेकर
४/४ श्रीम.स्वाती सचिन मेहता
रा.४/१ ते ४/४ सर्व रा.२/१०, फकीर महम्मद चाळ,
चाचा नगर, जोगेश्वरी पूर्व, मुंबई - ४०००६०

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे नांदले, ता. मुरुड, जि. रायगड येथील सर्व्हे नं./गट नं. ३३६ क्षेत्र १-९८-०० हे. आर. आकार १.०१ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस अपील क्र.३१/२०२३, दि.१८/०३/२०२४ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केलेले आहे सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि.०१/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावली होउन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २६/०८/२०२५
सही/-
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करीता

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वंजारवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतींचे मालक सविता घनश्याम गाजरे व समृद्धी घनश्याम गाजरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/प्लॉट नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रु. - पै. |
|---|---|---|
| ८/२/ब/१० | ०७-२५ (७२५ चौ.मी.) | ७२-५० |
| ८/२/अ/५ | ०५-०१ (५०१ चौ.मी.) | ५०-१० |
| ८/२/अ/७ | ०६-३९(६३९ चौ.मी.) | ६३-९० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकत व त्यामधील घर या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ३० ऑगस्ट २०२५
अॅड.शरद आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ. सो. लि.
कोतवालनगर कर्जत, ता.कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१ मो. नं.९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चिंचवली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत, तिचे संबंधित कब्जेदार/मालक १) शालिनी हरजीतसिंग सहानी, २) रेणुकासिंग हरजीतसिंग सहानी, यांच्याकडून आमचे अशिलांने कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चिंचवली | ५२/३/१ | ०-२३-१० | ७.४१ |
| | | पो.ख.०-०६-९० | |
| | | ०-३०-०० | |

सबब सदरच्या मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा याप्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर, सदरची मिळकत निर्वेध आणि बोजारहीत व कराराने खरेदी घेणेस योग्य आहे. असे समजुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ता. ३१/०८/२०२५
सही /-
अॅड. माधवी नारायण ठाकूर.
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ सर्वप्रकारचे आजार, लठ्ठपणा, संतानप्राप्ती, व्यसनमुक्ती, विवाह/सोनेतारण बिनव्याजी/लाखस दर महा ५०००/- घरबसल्या पिढ्यांपिढ्या लाखो कमविण्याची डॉ.नथुराम शिद्द (नागोठणा-पोयनाड) रायगड ७५०७१६६०१५

■ जन्नावार हॉस्पिटल अलिबाग मध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

■ मालाडे, अलिबाग-रोहा या रस्त्यालगत (१५ एकर) ६०० गुंठे शेत जमीन रुपये तीन लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १२४ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

■ श्रीगाव, अलिबाग येथे शेत जमीन २३० गुंठे, रुपये ४ लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक २७७ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२


■ वरसोली, अलिबाग येथे शहरालगत १०० गुंठे शेत जमीन रुपये २० लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १७३ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

■ PHARMACIST REQUIRED अलिबागमध्ये कामाला फार्मसिस्ट पाहिजे.अधिक माहितीसाठी संपर्क करा-९३७०६५३०५८.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## बोधकथा
# संत एकनाथ महाराज



हिमालया एवढे उत्तुंग व्यक्तिमत्व दासोपंत या नावाचे पुरुष होऊन गेले. ते नाथांना समकालीन होते.ते फार मोठे दत्त भक्त होते. त्यांची साधना एवढी मोठी होती की स्वतः भगवान श्री दत्त त्यांच्याबरोबर सोंगट्याचा डाव खेळायला बसत असत.केवढे हे ऐश्वर्य!! श्री नाथांच्या घरी फाल्गुन वैद्य षष्ठीला श्री जनार्दन स्वामींचा पुण्यतिथी उत्सव होता. एकनाथ महाराज जातीने दासोपंतांच्याकडे आमंत्रण देण्यासाठी गेले होते. त्यावेळी श्री दासोपंत आणि श्रीदत्त सोंगट्या खेळत होते. श्री नाथांनी दासोपंतांच्या घराच्या पायऱ्या चढताच भगवान श्री दत्त अदृश्य झाले.त्याचवेळी श्री एकनाथ घरात शिरले. श्री नाथांना पाहताच श्री दासोपंत मोठ्याने म्हणाले, किती रे दुर्दैवी माणूस तू!

हा बघ पट. मी आणि भगवान श्री दत्त आता सोंगट्या खेळत होतो, तू घरात शिरलास आणि ते अदृश्य झाले. श्रीनाथ अत्यंत लीनतेने म्हणाले, खरे आहे. माझ्याकडे वद्य षष्ठीला श्री जनार्दन स्वामींचे पुण्यस्मरण आहे म्हणून मी आपल्याला बोलवायला आलो आहे. आपल्याला आता होय नाही करता येणार नाही. मी दुर्दैवी आहे. म्हणून आपल्यासारख्या संतांनी माझ्याकडे येऊन माझ्या उद्धाराचा मार्ग मला दाखविलाच पाहिजे. हे संतांचे ब्रीद आहे. हे दोघेही सत्पुरुष एकमेकांच्या परिचयाचे च होते. फाल्गुन वद्य षष्ठी या दिवशी श्री दासोपंत पैठणला श्री एकनाथ महाराजांच्या घरी गेले. श्री नाथांच्या वाड्याजवळ येताच दिंडी दरवाजासमोर भालदाराच्या वेषात प्रत्यक्ष श्री दत्ताचे दर्शन झाले. अनन्यगतिक अशा श्रीदासोपंतांनी भगवान दत्तांना विचारले देवाधिदेवा! आपण स्वतः इथे? आणि या वेषात ? भगवान श्री दत्त म्हणाले, अरे दिंडी दरवाजातून तू आत डोकावून पहा. भगवान श्रीकृष्ण पाणी भरतो आहे. मालकाकडे आज कार्य आहे.आश्चर्याने स्तंभित झालेले दासोपंत म्हणाले देवा, श्री एकनाथ माझ्याकडे आले होते तेव्हा आपण अदृश्य का झालात? भगवान श्रीदत्त म्हणाले, अरे मालकांसमोर कसे खेळायचे?

### सद्‌गुरू स्वामी बोध

या सगळ्या मोठ्या लोकांच्या गोष्टी. मोठ्या रम्य कथा. याचा अर्थ एवढाच की अशा तऱ्हेचे भाग्यवान देह वाटेवर पडले नाहीत. ते इतके स्वस्त नाहीत. ते मागून मिळत नाही. त्यासाठी अमापपुण्य आणि साधूंची संगती जन्मोजन्मी असावी लागते. म्हणून आपण एक क्षणभरही हरिनामाशिवाय घालवू नये.

## नाला तुंबल्याने रोहा-नागोठणे
# मुख्य रस्ता पाण्याखाली

**। रोहा । प्रतिनिधी।**

तीन चार तास पडलेल्या मुसळधार पावसामुळे अष्टमी गावाकडे जाणारा मुख्य नाला तुंबल्याने रोहा-नागोठणे हा मुख्य रस्ता पाण्याखाली गेल्याने यातून मार्ग काढताना वाहन चालकांची तारांबळ उडाली होती. शुक्रवार व शनिवार सलग दोन दिवस मुसळधार पावसाने पुन्हा एकदा सुरुवात केल्यानंतर अनेक ठिकाणी सखल भागात पावसाचे पाणी तुंबल्याने रहिवाशी, वाहन चालक, पादचारी एकंदरीत साऱ्यांची धावपळ उडाली होती.



मागील दोन दिवसापासून पावसामुळे नदी, नाले, ओहल तुडुंब भरून वाहत होते. कुंडलिका नदीतील पाण्याच्या पातळी देखील वाढ झाली आहे. त्यातच रोहे शहरातील अष्टमी गावाकडे जाणारा नाक्यावरील जुना जकात येथील मुख्य नाल्यात पुन्हा एकदा कचरा अडकल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने नाला तुंबून नाक्यावरील रक्तपेढी व सफामर्वाह इमारत चाळ समोरील गटार ओव्हरफ्लॉ झाल्याने रोहा-नागोठणे मुख्य रस्त्यावरून ढोपरभर पाणी वाहत असल्याने दोन्ही मार्गावरील येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना पाण्यातून मार्ग काढावा लागला.

नगर पालिकेच्या नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांना व वाहन चालकांना नाहक फटका सहन करावा लागत नाही. नगर पालिका प्रशासनाने यावर कायमस्वरूपी उपाय योजना करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

> **नाला तुंबल्याने रोहा-नागोठणे हम रस्त्यावर पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याची माहिती समजताच नगर पालिका कर्मचारी वर्ग लावून सदर नाला स्वछ करण्यात आला. व त्यामुळे पाण्याचा निचरा झालेला आहे. भविष्यात या विषयी चांगली उपाय योजना करावी लागणार.**
> **-मनोज पुळेकर**
> **नगर पालिकेचे आरोग्य निरीक्षक**



# नागोठणे शहर परिसरात दीड दिवसांच्या बाप्पांना निरोप

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणेसह परिसरातील गावागावांत 'गणपती बाप्पा मोरया... मंगलमुर्ती मोरया' या जयघोषात सुमारे सार्वजनिक, घरगुती गणरायांची प्रतिष्ठापना करण्यात आली. यातील नागोठणे शहर व परिसरातील दीड दिवसांच्या दोन सार्वजनिक व सातशेहून अधिक घरगुती गणपती बाप्पांची दोन दिवस मनोभावे सेवाभावी पूजा अर्चा करून शुक्रवार दि. २८ रोजी सायंकाळी पारंपारिक पद्धतीने वाजत- गाजत गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकर या... अशा जयघोषात आपल्या लाडक्या बाप्पांना भक्तीमय वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला.

यावेळी परिसरातील ७०० हून अधिक घरगुती गणपती बाप्पांना भक्तगणांकडून भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी नागोठणे सहा. पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी विसर्जन मार्गावर, विसर्जन स्थळी व अंबा नदी घाटावर चोख बंदोबस्त ठेवला होता.



# शिवकालीन गणपती मंदिर ठरते भाविकांचे आकर्षण

**। माणगांव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील गोवेले हे गाव गर्द हिरव्यागार झाडीत तेथील गणपती मंदिर पेशवेकालीन असून मंदिराला ऐतिहासिक वारसा आहे. हा गणपती नवसाला पावतो अशी ग्रामस्थांची खात्री आहे. पुण्याच्या पुरातत्व खात्यामध्ये हे मंदिर पेशवेकालीन असावे अशी नोंद आहे. कारण श्रीमंत पेशव्यांचे श्रीवर्धन जन्मगाव असून ते गोवेले मार्गे श्रीवर्धनला जात असत. त्यावेळी श्रीमंत पेशव्यांनी या मंदिराची स्थापना करुन कालांतराने तेथे मंदिर बांधण्यात आले. काही काळ येथील मंदिरातील दिवाबत्तीसाठी सरकारी निधी मिळत असे, असे काही जाणकारांचे म्हणणे आहे. सन २००९ साली गोवेले ग्रामस्थांनी या मंदिराचा जिर्णोध्दार केला. तेव्हापासून येथे माघी गणेश जयंती उत्साहाने साजरी करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

# मराठा आंदोलकांसाठी कर्जतमधून चटणी भाकरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मुंबईमध्ये मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील सकल मराठा समाजाकरुन न्याहारीची सोय करण्याचे नियोजन केले आहे. सकल मराठा समाजाने चटणी भाकरी यांची मोठी जबाबदारी उचलली आहे. शनिवारी सायंकाळी कर्जत येथून चटणी-भाकरी घेऊन मराठा आंदोलक मुंबईकडे निघाले आहेत.

मुंबईत उपासमार होऊ नये या हेतूने चटणी-भाकरी घेऊन उदय पाटील, अनिल भोसले, शंकर थोरवे, अनिल मोरे, प्रदीप ठाकरे, अरुण देशमुख, सागर शेळके, प्रथमेश मोरे, सुरेश बोराडे, प्रमिला बोराडे, विनोद पवाळी, सागर शेळके, बजरंग श्रीखंडे, मनोज लाड रोशन दगडे, कैलास म्हामले, अल्पेश मनवे, निलेश धारणे, रोहिदास बडेकर, गजानन बोराडे, जयंत पाटील, प्रविण ठाकरे, राजेश थोरवे आदी रवाना झाले आहेत.



# सुजल धाडवेची नौदलात निवड

सुकेळी : रोहा तालुक्यातील नागोठणे जवळच असलेल्या बाळसई गावातील तरुण सुजल महादेव धाडवेची भारतीय नौदलात निवड झाली. त्याच्या या निवडीमुळे बाळसई गावाचे नाव उज्वल झाले असून बाळसई गावासह संपूर्ण तालुक्यातुन त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भारतीय नौदलाच्या सन २०२५ च्या झालेल्या परिक्षेत भारतीय नौदलात त्याची निवड झाली. त्यांनी उज्वल यश संपादन करीत उत्तुंग अशी भरारी घेत भारतीय नौदलामध्ये भरती होण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण केले. याच्या यशाबद्दल ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व तरुण मंडळ बाळसई यांच्यासह संपूर्ण रोहा तालुक्यासह नागोठणे परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## शेतकरी खुश

**सोगाव :** परिसरात आतपर्यंत चांगला पडलेल्या पाउस पडल्यामुळे भात शेती उत्तम झाली असल्यामुळे परिसरातील शेतकरी खुश असून यंदा चांगले पीक येईल असे बोलले जात आहे. सध्या शेतीच्या लायक पाऊस पडत आहे.

# तळवली गावाने जपली भजन परंपरा

**। खांब । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव काळात लाडक्या बाप्पासमोर भजनाचा कार्यक्रम करून जागरण करण्याची परंपरा रोहे तालुक्यातील श्री क्षेत्र तळवलीतर्फे अष्टमी गावाने कायम जपली आहे. गावातील भजन परंपरा शंभर वर्षाहून जुनी आहे. तळवली गावातील तरूण मुले, पुरुष वर्ग व जुनी जाणती मंडळीने मात्र आपली भजनाची परंपरा कायम राखली आहे. या भजनामध्ये संतांची भजने, गौळणी, भारूड गायली जातात. बाप्पाची गीते तसेच विविध भक्तीगीते व पौराणिक गीतांचीही जोड देऊन भजन जागरणाच्या कार्यक्रमात रंगत आणली जात आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य ३१ ऑगस्ट २०२५ते ०६ सप्टेंबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## वादविवादापासून दूर राहा

**मेष :** हा साप्ताह मेषराशीधारकांना त्वचे संदर्भात काही समस्या उद्भवू शकतात. म्हणून जास्त पाणी प्या आणि दिवसातून वेळ काढून योगाभ्यास वगैरे करा.आठवड्याच्या शेवटी, कदाचित पैसे मिळविण्याची आपली इच्छा बळकट होऊ शकेल. काही लोक चुकीच्या मार्गाने पैसे कमवण्यास अजिबात संकोच करणार नाहीत. त्यामुळे आपण पैशासाठी कोणताही चुकीचा मार्ग अवलंबू नका, अन्यथा येणाऱ्या काळात त्रास होऊ शकतो. लोकांशी संवाद साधताना आपल्याला आपले बोलणे नियंत्रित करावे लागेल, आपली एखादी गोष्ट आपल्या जवळच्या व्यक्तींना दुखवू शकते. शुक्र ग्रहाच्या संक्रमणामुळे आपले आरोग्य कमी होण्याची शक्यता आहे, म्हणून स्वतः ला तंदुरुस्त ठेवण्यासाठी योग वगैरे करा. तुम्ही जितके राजकारणापासून आणि वादविवादापासून दूर राहाल तितकेच तुमच्यासाठी ते अधिक चांगले राहील. **महिलांना :** महिलावर्गाने तब्बेती ची विशेष काळजी घ्यावी जागरण व अतिताण धोकादायक ठरू शकतो. यासाठी गुरुवारी ब्राह्मणांना दान द्या. किवा माशाला खाण्यास द्या तब्बेत चांगली होईल. **शुभ दिनांक :** ०२,०३.

## कामात गुंतून राहा

**वृषभ :** हा साप्ताह वृषभ राशीसाठी सप्ताहाच्या सुरवातीमध्ये तुम्हाला बऱ्याच स्रोतांनी धन लाभ होण्याची शक्यता आहे तथापी, या सप्ताहात तुम्हाला धन पेक्षा अधिक स्वास्थ्य लाभावर लक्ष दिले पाहिजे यासाठी तुम्हाला स्वस्थ्य दिनचर्येचे पालन करून योग-ध्यान इत्यादींचा सहारा घेतला पाहिजे. ही गोष्ट समजून की, धन पेक्षा अधिक महत्वाचे तुमचे आरोग्य आहे. स्वस्थ्य आरोग्य असेल तरच तुम्ही जीवनाचा आनंद घेऊ शकतात. व्यवसाय करत असाल तर, आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांच्या गरजेची काळजी घ्या. सप्ताहाच्या पुढील चरणात चंद्र देव तुमच्यावर प्रसन्नहोतील. तरीही या काळात तुम्ही थोडे सावधानीने काम करण्याची आवश्यकता आहे. कुठले ही गरजेचे काम करण्याच्या आधी घरातील लोकांचा सल्ला नक्कीच घ्या. घरापासून लांब राहत असाल तर, आपल्या आरोग्याची काळजी घ्या. सप्ताहाच्या शेवटी शारीरिक रूपात तुम्हाला तंदुरुस्त वाटेल. **महिलांना :** कोणाचेही बोलणे मनाला लाऊन घेऊ नका त्यात आपली शक्ती वाया जाते हे लक्षात ठेवा. आपल्या कामात गुंतून राहा. **शुभ दिनांक :** ०४,०५.

## अतिविचार करू नका

**मिथुन :** हा साप्ताह मिथुन राशीसाठी मानसिक संतुलन कायम ठेवण्यासाठी प्राणायाम करा. कपडा, शेती क्षेत्रात ही या राशीतील जातक चांगले प्रदर्शन करू शकतील. या सप्ताहात या राशीतील जातक मनोरंजनाच्या साधनांवर खर्च करू शकतात. प्रशिक्षणार्थीयांना आपल्या अभ्यासाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. काहीवेळा हा कालावधी अडचणीचा ठरू शकतो. प्रत्येक पाऊल सावधानपूर्वक उचलण्याची गरज आहे. ताक देखील फुकून पिण्याचा कालावधी आहे. कोणतीही गोष्ट घाईत करू नका, तसेच गरज नसणाऱ्या गोष्टीचा अतिविचार करू नका. आपले विरोधक आपल्यावर कुरघोडी करू शकतात. कामावर थोडा तणाव अनुभवाल आर्थिक अडचण दूर करण्यासाठी बुधवारी मोनपाळणे फायद्याचे ठरेल. कोणतही महत्वाचे काम योग्य सल्ल्याशिवाय करू नका. थोडे थांबा वाट पाहा मार्ग मिळेल. राजकारणी व्यक्तींनी या कालावधीत सावध राहावे आपल्यावर आरोप होऊ शकतात. **महिलांना :** महिलावर्गाने या कालवधीत शाकाहारी होणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. घरात एकादी गोड बातमी मिळण्याचा संभव आहे, सकाळी मुंग्यांना थोडी साखर घालावी. **शुभ दिनांक :** ०३,०६

## विचारापासून दूर राहा

**कर्क :** हा साप्ताह कर्क राशीसाठी अडचणी दूर करणारा असेल. जी कामे अडकली असतील तिला चालना देण्यास हरकत नाही ती योग्य मार्गाने होऊ शकतात. जमिनीच्या व्यवहारात काम करणाऱ्या व्यक्तींना फायदा संभवतो, आपला भावनेच्या भरात वहात जाणारा स्वभावावर नियत्रण मिळवू शकलात तर कोणतेही कठीण काम या सप्ताहात पूर्ण करू शकाल. शत्रूने आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला तरी या कालावधीत आपल्या हित चिंतकानमुळे आपल्याला साह्य मिळणार आहे त्यामुळे या गोष्ट मनावर घेत बसू नका. नकारात्मक विचारापासून दूर राहणे आपल्या हिताचे आहे. घरातील कामासाठी थोडा अधिक वेळ देणे आपल्यासाठी चांगले ठरेल. आपल्याला कार्यात यश मिळण्याचा मार्गमोकळा असल्यामुळे नव्या कार्याला सुरुवात करण्यास हरकत नाही. कामामधून आपल्या कार्याला वाव देणाऱ्या घटना घडणार आहेत अशावेळी पाठ फिरवू नका. सोभोवताली आनंदी वातारण राहील. **महिलांना :** महिलावर्गाने या कलावधीत कर्ज, उधारी या भानगडीत पडू नये. घरात स्वयंपाक करताना योग्य काळजी घ्या. **शुभ दिनांक :** ०२,०५.

## खर्चावर नियंत्रण ठेवा

**सिंह :** हा साप्ताह सिंह राशीसाठी धनाचा मार्ग मोकळा करणारी असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण होणार आहे. आता केलेली बचतच पुढे उपयोगी पडू शकते. त्याबरोबर हा कालावधी थोड गंभीरतेने घेण्याचा सुद्धा आहे. कोणतीही गोष्ट हलक्याफुलक्यारीतीने घेऊ नका. दुसऱ्यांनच्या कामाकडे यावेळी लक्ष न देता स्वताच्या कामाकडे लक्ष देण हे आपल्याला हितकारक आहे. उगाचच दुसऱ्याच्या भानगडीत नाक घुसवून आपण अडचणीत येऊ नका. आपले दुख कोणाला न सांगता मनात दाबून ठेवणे हे तब्बेतीच्या दृष्टीने त्रासदायक ठरू शकते. नोकरदारवर्गाला मनाजोगत्या बदलीसाठी वरिष्ठांना बोलण्यास हरकत नाही. मात्र कामावर वादविवादापासून लांब रहाणे चांगले होईल. व्यापारी वर्गाने एकद्या नवीन व्यवहारात भाग घेण्यास हरकत नाही. साठवणुकीच्या भानगडीत मात्र पडू नये. विशेषता तरुणांनी या कालावधीत मोबाईल, इंटरनेट ही गोष्ट पूर्ण सावधानतेनेच वापराव्यात. **महिलांना :** महिलावर्गाने भले आपले काम भले अस धोरण ठेवणे फायद्याचे राहील, नवीन कपडा, दागिने याची खरेदी संभवते. **शुभ दिनांक :** ३१,०१.

## अनोळखी व्यक्तीशी व्यवहार टाळा

**कन्या :** हा साप्ताह कन्या राशीसाठी सावधनता बाळगणारा असणार आहे. कोणत्याही वादविवादापासून लांब राहा, विशेषता तरुणांनी या कालावधीत मोबाईल, इंटरनेट ही गोष्ट पूर्ण सावधानतेनेच वापराव्यात ज्यांना शक्य असेल त्यांनी या पासूनलांब राहणे चांगले ठरेल. कोणताही पैशाचा व्यवहार करताना लक्षपूर्वक करावा महत्वाची कागदपत्रे कितीही जवळची व्यक्ती असली तरी पूर्ण वाचूनच त्यावर सही करावी. अनोळखी व्यक्तीशी व्यवहार टाळणे योग्य होऊ शकते पण त्यात हि व्यवहार आवश्यक असेल तर तो हा कालावधी संपल्यानंतर करणे उत्तम राहील. नोकदार व्यवसाईकांनी सध्या कोणताही मोठा बदल करू नका, लवकरच परिस्थितीत सामान्य होणार आहे थोडा संयम गरजेचा राहील. मानसिक आरोग्य हीच शारीरिक आरोग्याची गुरुकिल्ली आहे हे विसरू नका. साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना मानसन्मान मिळण्याची संधी आहे त्यांनी प्रयत्न करण्यास हरकत नाही कुंडलीत राजयोग असेल तर हा कालावधी राजकारण्यासाठी चांगली बातमी देणारा ठरू शकतो. **महिलांना :** महिलावर्गाने तोंडावर नियंत्रण ठेवणे हे हितकारक आहे नाहीतर हि गोष्ट भांडणाला कारणीभूत होऊन यशाच्या मार्गात अडथला येऊ शकतो. **शुभ दिनांक :** ०२,०३.

## घरात शांतता राखा

**तुळ :** हा साप्ताह तुल राशीसाठी कटकटी निर्माण करणारा ठरू शकतो. कामाचा ताण, स्वरूप बदलणार आहे. मात्र त्याकडे संधी म्हणून पाहिलेत तर योग्यवेळी त्याचे पडसाद आपल्याला मिळणार आहेत. पैसे मिळवण्यात अडचणी येतील त्यामुळे निराश होऊ नका. थोडा संयम या कलावधीत गरजेचा आहे हळूहळू वातवरण सुधारत जाईल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींची काळजी घेण्याची गरज आहे त्याच्या नियमित औषध उपचाराकडे दुर्लक्ष करू नका. या राशीच्या व्यक्तींनी आपला प्रवास सावधान पूर्वक करावा प्रवासाला निघताना नियोजण करणे आवश्यक आहे त्यामुळे आपला होणारा त्रास वाचू शकेल, वहान चालवणाऱ्यांनी वाहनाच्या वेगा बाबत पूर्ण सावधानता पाळावी. आपली महत्वाची कागदपत्रे गहाळ होणार नाहीत याची काळजी घ्या. व्यापारीवर्गाने जास्त गुंतवणूक करण्याच्या भानगडीत पडू नका. घरात आपण शांत राहाण योग्य होईल नाहीतर कारण नसताना वातवरण बिघडेल त्याच्या परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. **महिलांना :** महिलांच्या हातात पैसा खेळता राहणार आहे. एखादे धार्मिककार्याची तयारी कराल. **शुभ दिनांक :** ०४,०५.

## कामांना गती मिळेल

**वृश्चिक :** हा साप्ताह वृश्चिक राशीसाठी थोडा निवांतपणाचा जाणार आहे. दुसऱ्यांना मदत करण्याची संधी सोडू नका यामुळे तुमचा भविष्यात फायदा होऊ शकेल. आपल्या जोडीदाराला मदत करावी लागेल, त्यामुळे घरातील वातवर चांगले ठेवता येईल. मित्रपरिवारा सोबत गाठभेट झाल्याने जुन्या आठवणीना उजाळा मिळेल. आपल्या कामात बदल करण्याचे विचार डोक्यात चालू असतील तर त्याला सध्याच्या स्थिती मध्ये हवा देऊ नका वातवरण चांगले नाही त्यामुळे नुकासन होऊ शकते. शांतपणे विचारपूर्वक घेतलेले निर्णय हे आपल्याला भविष्यासाठी उपयोगी पडणार आहेत. विशेषता भावनेच्या भरात घेतलेल्या निर्णया बाबत चूक होण्याची शक्यता राहील. उद्योगधंद्यात हळूहळू कामांना गती प्राप्त होईल. नोकरदारांनी मात्र थोडी सावध भूमिका घेण्याची गरज आहे. आपल्या आजूबाजूला लक्ष ठेऊन काम करावे. **महिलांना :** आपण भले की आपले काम भले असे धोरण आपल्याला हितकारक ठरणार आहे. घरात अचानक आलेल्या पाहुण्यांन मुले आपली धावपळ होणार आहे, मात्र अतिथि देवभव प्रमाणे आपल्याला आशीर्वाद मिळणार आहेत. **शुभ दिनांक :** ३१,०४.

## सद्सद विवेकबुद्धी जागृत ठेवा

**धनु :** हा साप्ताह धनु राशीसाठी शुभयोग घेऊन आलेला आहे. जे काही कराल त्यात यश सहज मिळू शकेल असा कालावधी असला तरीपण डोक्यात हवा जाऊन देऊ नका. आपल्याला एखादे नवीन आर्थिक स्तोत्रही मिळण्याचा संभव आहे. मात्र अशावेळी आपली सदविवेकबुद्धी जागृत ठेवणे महत्वाचे ठरेल. गैरमार्गाचा पैसा नको तो त्रास उत्पन्न करतो नाहीतर आपले जीवन नको त्या दिशेला घेऊन जातो. एखादा जवळचा मित्र आपल्या शब्दामुळे दूर जाणार नाही याची काळजी घ्या. कालावधी चांगला आहे या कालावधीत आपण चांगल्या योजना कार्यन्वित करू शकाल. आता केलेले सामाजिक काम आपल्याला भविष्यात उपयोगी पडणार आहे. नोकदारवर्गाला आपल्या कामामुळे प्रशंसा अनुभवण्यास मिळेल वरिष्ठ खुश असतील तेव्हा आपल्या पदोन्नतीचा प्रस्ताव त्यांना देण्यास हरकत नाही. मुलांचे अभ्यासात मन लागणाराकालावधी आहे. **महिलांना :** महिलावर्गाने जास्त ताण न घेता घरातील वातावरण हलक फुलक करण्याचा प्रयत्न करा. नोकरदार स्त्रियाना कामात आहे फक्त थोडा संयम ठेवा. **शुभ दिनांक :** ०१,०३.

## इच्छा पूर्ण होतील

**मकर :** हा साप्ताह मकर राशीसाठी त्यांनी भविष्याच्या दृष्टीकोनातून हालचाल करण्यास हरकत नाही. स्पर्धापरीक्षाच्या दृष्टीकोनातून आपली तयारी करा यश मिळेल. अनावश्यक खर्च वाढवणारा असू शकतो त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे हिताचे आहे. तरीही हा कलावधी आपल्यासाठी लाभदायक ठरणार आहे. आपल्याकडे येणाऱ्या पैशात वाढ संभवते आहे. नवीन व्यवसाय चालू करण्यास हरकत नाही. वहान, जागा खरेदीची इच्छा पुणे करण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल चालू होईल. आपण बऱ्याच दिवसाची एखादी अपूर्ण इच्छा पूर्ण करू शकाल. कामगारवर्गाच्या कामात सुधारणा झाल्याने या क्षेत्रात आपले वलय वाढेल. राजकरणात यश मिळेल.घरातील ज्येष्ठ व्यक्ति न विषयी चिंता वाढेल थोड त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. वेळेवर औषध उपचार केल्यास आजारपण लांब ठेवता येईल. चैनीवर खर्च करू नका, आपल्याकडे आलेल्या पैशाचे योग्य नियोजन आवकश्यक आहे.**महिलांना :** लांबच्या प्रवासाचा बेत केला जाईल. त्या संदर्भात नियोजन केले जाईल. मुली, मुलांना चांगले स्थळ येणार आहे. महिलांनी मन वाचनात रमवावे, सप्ताहाच्या शेवटी दिलासा देणाऱ्या घटना घडणार आहेत. **शुभ दिनांक :** ०२,०४.

## आर्थिक प्रश्न मार्गी लागतील

**कुंभ :** या साप्ताहात आपण घरघुती आर्थिक प्रश्नमार्गी लागू शकतील,बदल करण्याचे मनात असेल तर येणारा कालावधी मंदीचा असल्याने जोखीम घेऊ नका. नंतर संधि मिळणारखूपच आशादायक जाणार आहे. एखादे नवीन उत्पन्नाचे साधन आपल्याला गवसणार आहे. फक्त घाई करू नका अति घाई संकटात नेई हे लक्षात ठेवा. एखादी चांगली सुरवात आपल्याला लाभ देणारी ठरू शकेल, आपणकार्यरत असलेल्या कार्यक्षेत्रातहि वाढ होणार असल्यने, त्याचा फायदा आपल्याला मिळेल. हि आपल्या सर्वश्रेष्ठ कार्याची सुरवातहि असू शकते. बेरोजगारांनी नोकरीसाठी प्रयत्न करण्यास हरकत नाही. अनुभवी कलाकारांना एखादी मोठी संधी चालून येईल मोठा सन्मान प्राप्त होण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल सरू होईल. आत्मविश्वास वाढणाऱ्या घटना घडतील. घरात शुभकार्य करण्याच्या दृष्टीने तयारी कराल. लहान मोठे खर्च होतील पण पैशाचा मार्ग हि आपल्याकडे वळणार असल्याने त्या खर्चाची गणिते जुळतील. **महिलांना :** आपल्या संबधीतामध्ये लढाई, झगडा होऊ शकतो त्यामुळे आपला व्यवहार सरळसोट ठेबा. संसारिक आयुष्यात थोडा अशांतपणा जाणवला तरी नवीन सप्ताहात आपल्याला दिलासा मिळणार आहे. **शुभ दिनांक :** ०३,०४.

## आरोग्याबद्दल सावधगिरी बाळगा

हा साप्ताह मीन राशीसाठी जीवनात चढ-उतार आणू शकतो. यावेळी आपण घाईत कोणताही निर्णय घेऊ नये अन्यथा नुकसान होऊ शकते. या राशीच्या लोकांना आरोग्याबद्दल सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, बाहेर तळलेले अन्न आपल्याला आजारी बनवू शकते. हा काळ या राशीच्या व्यापाऱ्यांसाठी खासकरुन परदेशी देशांशी संबंधित व्यवसाय करणाऱ्यांसाठी चांगला असेल.आठवड्याच्या पुढच्या टप्प्यात, चंद्राचे संक्रमण जीवनाच्या काही समस्यांवर मात करू शकतो. आपण मनापेक्षा जास्त बुद्धीचा वापर कराल आणि आपल्यासाठी जे चांगले आहे त्याला प्राधान्य द्याल. या राशीचे काही लोक सकारात्मक बदलांसाठी काही काळ जगापासून दूर होऊ शकतात. कौटुंबिक जीवनात पालकांचा पाठिंबा आयुष्यातील बऱ्याच समस्या दूर करेल. तुमचे काही काम लांबणीवर पडेल, तुम्हाला आरोग्याबाबतही काळजी घ्यावी लागेल. **महिलांना :** महिलावर्गाचा हा कालवधी सणसमारंभात व्यस्त होणार आहे. घरात नवीन वस्तूची खरेदी करताना लक्षपूर्वक घ्या, फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. **शुभ दिनांक :** ०२,०६.

# गौरीपूजन आणि मातृवात्सल्य



धनंजय शेटये

पुत्रप्रेमाने काळजीत असलेल्या मातेची आपल्या बाळाप्रती असलेली ओढ ज्या सणांतून व्यक्त केली जाते, तो सोहळा म्हणजे माता गौराई देवीचे पूजन होय. मातृवात्सल्याची अनोखी अनुभूती म्हणजे गौरी आगमन.

माता पार्वती व वडील भगवान शंकराचा आशीर्वाद घेऊन गणपती बाप्पा भूतलावर विराजमान होण्यासाठी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला एकटेच प्रयाण करतात. सोबत फक्त मूषक वाहन घेऊन निघतात. शेवटी माताच ती.. आपला बाळ एकटाच भूतलावर गेला आहे याची तिला चिंता लागून राहते. आपला गणेश एकटा काय करत असेल ? म्हणून माता गौराई फक्त दोन दिवसांसाठी भूतलावर येते. सर्वमहिलांना मातृवात्सल्याच्या अनुभूतीचा खरा आनंद अनुभवायला शिकवते. गौराईचं भूतलावर येणं म्हणजे माताभगिनींसाठी उत्साहाचे नवचैतन्य असते.

भारतीय सण-उत्सवांच्या परंपरेत गौरी पूजन विशेष स्थान आहे. गणेशोत्सव साजरा करताना अनेक ठिकाणी गौरीचे आगमन होते आणि त्यांची पूजा केली जाते. या सोहळ्याला ‘गौरीपूजन’ म्हणून ओळखलं जातं.

पौराणिक कथेनुसार, गौरी ही पार्वती देवीचे रूप मानले जाते.

गणपती बाप्पाच्या आगमनानंतर माता गौरी दोन दिवस आपल्या पुत्राला भेटण्यासाठी घरी येतात, असा समज आहे. त्यामुळे गणेश व गौरी यांचे एकत्रित पूजन केले जाते. गौरीचे आगमन म्हणजे समृद्धी, सौभाग्य व सुख-शांती घेऊन येणं.

आगमन व पूजन पद्धती गणेश चतुर्थीनंतर भाद्रपद शुद्ध षष्ठी किंवा सप्तमीला गौरीचे आगमन केले जाते.

गौरी-गणेशासमोर फुले, फळे, नैवेद्य ठेवून पूजन केले जाते.

विशेषतः स्त्रिया उपवास करून हलदी-कुंकवाचा सोहळा करतात. सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व आहे.

‘गौरी’ हा सण स्त्रियांच्या श्रद्धा, भक्ती आणि सामूहिकतेचा उत्सव आहे.

‘ओटी भरणे’ (सौभाग्यवस्तू देणे) या परंपरेतून सामाजिक नातेसंबंध दृढ होतात.

घराघरांतून या सणामुळे ऐक्य, आपुलकी आणि आनंद वाढतो.

गौरी दोन दिवस घरात राहतात. तिसऱ्या दिवशी त्यांचे गणेशासोबत विसर्जन केले जातो. भावपूर्ण वातावरणात त्या निरोप घेतात.

गणेशोत्सव हा जसा गणपती बाप्पाच्या मंगलमय उपस्थितीचा उत्सव आहे, तसाच गौरी पूजन हा मातृशक्तीच्या गौरवाचा सोहळा आहे.

गौरी-गणेश या एकत्र पूजनामुळे आपल्या जीवनात सुख, सौंदर्य, सौभाग्य व समृद्धी येते, असा लोकांचा विश्वास आहे. गौरीचे आगमन करताना सवाष्ण स्त्रिया नटून-थटून विहिरीच्या काठावरुन हळदीचे रोप, आघाडाचे रोप, हरण, तिरडा अशी रोपे एका कलशातून घरी घेऊन येतात. आगमनापूर्वी नदीकाठावर यथासांग पूजा करून स्त्रिया सामूहिक आरती गातात, नंतर गौराईला घरी आणतात. पण, घरी आणताना त्याच विहिरीतील पाणी तोंडांत भरुन न बोलता गौरी देवी घरी आणली जाते. घराचे सडासारवण करुन हळदीच्या पाण्याची रांगोळी काढून त्या रांगळीवरच पाय ठेवत गौरी घेऊन येणाऱ्या स्त्रीला अलगद चालावे लागते. गणपतीच्या आसना शेजारी गौराई देवी विराजमान होतात.

नवविवाहित जोडपे ओवशासाठी गौरीपूजनानिमित्त आवर्जून गावी येतात. ओवशाची पूजा करण्यासाठी ब्राह्मणाला निमंत्रित केले जाते.

गौरी पूजनाच्या दिवशी ‘ओवसा’ (वंशवेल) वृद्धी संकल्पासाठी, वंशावळीच्या सुखसमृद्धीसाठी घरातील सर्व सवाष्ण स्त्रिया बांबूपासून बनविलेल्या सुपाला सजवून त्या सुपामध्ये आपल्या शेतातील किंवा परसदारीची हळदीची पाने, काकडीची, भोपळाची, पडवळ, दोडका अशा पाच प्रकारच्या पाच पाच म्हणजे एकूण २५ अशा प्रत्येक पानाला हळद, कुंकू लावून पानांमध्ये पाच फळांचा बारीक केलेला प्रसाद भरला जातो.त्या प्रसादाला सजवलेल्या सुपामध्ये भरुन त्या प्रत्येक सुपामध्ये नारळाला आंब्याचे एक पान दोऱ्याने बांधून त्या नारळाची पूजा केली जाते. नंतर मखमली वस्त्राने आच्छादन करून असा भरलेला ‘ओवसा’ घरच्या आकारासमोर श्रीगणेशाच्या आसनासमोर अर्पण गौराई देवीची खणानारळाने ओटी भरली जाते. हा ओवसा घेऊन सवाष्ण स्त्रिया घरातील वडीलधाऱ्या माणसांच्या हाती देऊन नमस्कार करतात. त्यावेळी वडीलधारी मंडळी शंभर-पाचशे रूपये वंश औक्षण त्या ओवशामध्ये ठेवतात. मग हा ‘ओवसा’ घेऊन घरातील सर्व सवाष्ण स्त्रिया नटूनथटून गावभर फिरतात. अनेक नातेवाईकांचा आशीर्वाद घेण्यासाठी गावात फिरतात. प्रत्येक घरात जेवढ्या स्त्रिया असतात, तेवढे ‘ओवसे’ भरले जातात. काही प्रांतात एक अनोखी प्रथा आहे. एखाद्या स्त्रीला एकच मुलं असेल, तर ‘तीन डोकी’ ओवसा पूजन त्याज्य मानले जाते. गौराई देवीसमोर वार्षिक नवस बोलण्याची प्रथा आहे, तर काही ठिकाणी इच्छित फळ प्राप्त झाले, तर दिगंबर अवस्थेत फुगडी घालण्याचे नवस बोलले जातात. अमग संपूर्ण घरदार बंद करुन दिगंबर अवस्थेत फुगडी घालून संबंधित व्यक्ती नवस फेडते. काही प्रांतात गौराईला फक्त भाकरी आणि शेवग्याच्या पाल्याची भाजीचाच नैवेद्य दाखवला जातो. तळकोकणात मांसाहारी नैवेद्य दाखविण्याची तुरळक ठिकाणी प्रथा असल्याचे बोलले जाते. कोकण प्रांतात गौरी पूजनादिवशी शेवग्याच्या पानांच्या भाजीला प्रचंड मागणी असते. या दिवशी पानांची जुडी ५०/६० रुपयांना विकली जाते.

गौराई देवीला शेवग्याच्या पानांची भाजी व भाकरी हाच नैवेद्य दाखविला जातो. काही घरात रात्री मंगळागौर म्हणून खास भजन व महिलांच्या फुगड्या, झिम्मा खेळला जातो.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गौराई देवीचे विहिरीकाठी निसर्गाच्या सान्निध्यात स्त्रिया गौराई देवीची महाआरती करतात आणि विसर्जन केले जाते. गौराईचं आगमन करताना आणलेली पंचरोप परत ती सर्व रोपं जिथून आणली, तिथेच लावली जातात. पर्यावरण संतुलन आणि संवर्धन हा संदेश देणारा हा गौरीपूजनाचा सोहळा अतिशय नयनरम्य असतो. गणेशोत्सवातील गौराई देवीचा हा उत्सव साजरा करताना आबालवृद्ध आनंदीत असतात. **

## हृद्य आठवणी...

# बखर कल्यांची

पुस्तक परीक्षण

प्रा. शाम जोगळेकर

मो. ९२७३३४३१७७

‘बखर कल्यांची’ हे राजीव नरसिंह लिमये लिखित पुस्तक सत्त्वश्री प्रकाशनने प्रकाशित केले आहे. ज्येष्ठ लेखक ॲड. विलास पाटणे यांची वेधक आणि मार्मिक प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. त्यांच्यामते, आत्मचरित्राच्या अंगाने जाणाऱ्या बखरीत माणसे, निसर्ग, जनावरे, शेती याविषयीचे चलतचित्रण आपल्याला वाचायला मिळते!... कोणताही अभिनिवेश न बाळगता प्रांजल निवेदनातून कल्यांचे चित्र आपल्याला कॅनव्हासवर अनेक रंगात चितारलेले आढळते. ‘काजळीच्या तीरावरून’ या शीर्षकान्वये राजीव लिमये यांनी आपले मनोगत मांडले आहे. निवृत्तीनंतर त्यांनी फेसबुकवर आपल्या आठवणी लिहिण्यास सुरुवात केली. ‘स्वांत सुखाय’ केलेले हे लेखन आता पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे. राजीव लिमये ‘कल्यांची बखर’ असे म्हणतात, कारण हा काही कल्यांचा इतिहास नव्हे, याची त्यांना जाणीव आहे. या पुस्तकात छोटे-मोठे असे, ४८ लेख आहेत. पुस्तकाचे रंगीत, अप्रतिम मुखपृष्ठ गौरव पिलणकर यांचे आहे. पुस्तकातील वेगळ्या शैलीतील रेखाचित्रे श्रेया जोशी-लिमये यांची आहेत.




नोकरीतील अखेरच्या काळात, विविध आठवणी सांगताना राजीव लिहितात की, रत्नागिरीतील वाढत्या उद्योगीकरणामुळे त्याकाळी, सहजपणे नोकऱ्या उपलब्ध झाल्या. निवृत्तीचे पुढील आयुष्य आता संथ असेल, असे त्यावेळी त्यांना वाटले होते. महसूल खात्यात नोकरी करणाऱ्या वडिलांची बदली राजापूरला झाल्याने तेथील बालपणीचे अनुभव लेखकाने सविस्तरपणे मांडले आहेत. घरातील वातावरण, वाचनाचे आणि अन्य संस्कार कसे झाले याचीही वाचकाला जाणीव होते. नंतरच्या काही लेखांद्वारे आपल्या गावची ओळख सविस्तरपणे करून दिली आहे. त्यामधून तेथील आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचे उत्तम दर्शन होते. नंतरच्या विविध लेखांतून राजीव यांनी आपल्या कुटुंबातील विविध ज्येष्ठांच्या आठवणी सविस्तरपणे मांडल्या आहेत.

यशोदाआजी, साधेसुधे आजोबा, आई, वडील यांच्या आठवणी विलक्षण हृद्य आहेत. त्यामधून त्यांची स्वभाववैशिष्ट्ये कशी आणि का निर्माण झाली, ते समजते. त्यावेळची गुंतागुंतीची नाती आणि त्या नात्यांतील गोडवा आजच्या काळात विलक्षण वाटतो. तेव्हा भेटीगाठी कमी होत्या आणि वाहतूक दळणवळणातील त्रुटींमुळे, काहीशा अवघडही होत्या. त्यानंतरच्या विविध लेखांतून भवतालच्या लक्षणीय व्यक्तिमत्त्वांची शब्दचित्रे लेखकाने उत्तम प्रकारे रेखाटली आहेत. ‘पाग्या इनूस’ हे व्यक्तिचित्र दीर्घकाळ लक्षात राहील असे आहे. कोकणी माणसातील फटकळपणा आणि विनोदी स्वभाव यांचे मिश्रण, त्याच्या व्यक्तिमत्त्वात झाल्याचे दिसून येते. गावातील विविध परिचित कुटुंबांची ओळख नंतरच्या लेखांतून करून दिली आहे. त्या काळातील शेतीवर आधारित परस्परावलंबी जीवनाची ओळख विविध लेखांतून वाचकाला होते. आर्थिक संबंध आणि तरीही प्रेमळ सामाजिक संबंध कसे वृद्धिंगत झाले याचे उत्तम दर्शन त्यामधून होते. कोळंबे गावच्या पणजोळच्या, दामले कुटुंबाच्या आठवणी, जणू त्याकाळचे शब्दचित्रच वाचकासमोर रेखाटते आहे. विविध जाती आणि धर्मातील त्या काळातील एकोपा हृद्य आहे आणि अनुकरणीयही! कल्यातील आय. वाय. सोलकर यांच्या विविधांगी, संपन्न व्यक्तिमत्त्वाची ओळख लेखकाने उत्तम प्रकारे करून दिली आहे. प्राथमिक शाळा आणि शिर्के हायस्कूलमधील शिक्षण काळातील आपले अनुभव मांडताना, लेखकाने कल्यातील घाटीचे वर्णन उत्तम प्रकारे केले आहे. प्रस्तुत लेखकाला तो भाग सुपरिचित असल्याने त्यामुळे पुनःप्रत्ययाचा आनंद होतो. ‘स्वगत – राहून गेलेलं काही’ या शेवटच्या लेखात लेखकाने राजकारणातील सक्रिय सहभागामुळे लाभलेले विविध अनुभव मांडले आहेत. आता समाजासाठी काही योगदान करण्याची मनोभूमिका असल्याचे शेवटी स्पष्ट केले आहे.

‘बखर कल्यांची’ या पुस्तकातून लेखकाच्या व्यक्तिगत अनुभवांतून, त्यावेळच्या सुखी, समाधानी आणि परस्परावलंबी समाज जीवनाचे उत्तम दर्शन होते. हे अनुभव सर्वसामान्यांनाही लेखन प्रवृत्त करतील याची खात्री वाटते. लेखकाने प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण काळातील विविध अनुभव मांडले आहेत. परंतु, महाविद्यालयीन जीवनातील शिक्षणाविषयीचे अनुभव मांडलेले नाहीत. त्या काळातील मित्रपरिवार, शिक्षक, प्राध्यापक यांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर निश्चितच परिणाम होत असतो. लेखांतील बारीक छपाईतील मजकूर वाचणे, माझ्यासारख्या ज्येष्ठ नागरिकांना त्रासदायक वाटू शकते आणि आता विविध पुस्तकांचे बहुसंख्य वाचक हे प्रौढ किंवा ज्येष्ठ नागरिकच असतात, हे लक्षात घेणे गरजेचे वाटते. पुस्तकाच्या मलपृष्ठावर राजीव लिमये यांचे आणि त्यांच्या ‘यशोदा’ या घराचे रंगीत छायाचित्रांतून दर्शन होत आहे. **

पुस्तकाचे नाव : बखर कल्यांची
लेखक : राजीव लिमये
प्रकाशक : सत्वश्री प्रकाशन, खेडशी, ता.जि. रत्नागिरी. ९४२२३८२६२१
प्रथमावृत्ती : १ जून २०२५
पृष्ठे : १०७. मूल्य : रु. १५०/-

# विकृतीवर घणाघात करणारी आशयघन कविता : ‘अस्वस्थ’

डी. बी. जगत्पुरिया

‘अस्वस्थ’ हा कवी कैलास भाले यांचा दुसरा दमदार कविता संग्रह आहे. त्यांनी अफाट दुःखाचा कटू अनुभव घेऊन त्याचा सत्त्वसार आपल्या कवितांमधून मांडला आहे. “माझ्याकडे सुखाने कायमची पाठ फिरवली!” असं मनोगतात म्हणणारा हा मूल्यधर्मी कवी, वंचित, उपेक्षित, दुर्लक्षितांचं दुःख आपल्या कवितेच्या कवेत घेऊन त्यावर फुंकर घालतो ही बाब स्तुत्य आहे.

या कवीने अस्वस्थ होत अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. जेव्हा सर्जनोत्सुक मन अस्वस्थ असतं, तेव्हाच दमदार कविता साकारत असते. लेखणी झुंजार बनत असते.

**“झुंजार लेखणीला हरणे, कबूल नाही**
**झुंजार लेखलीला झुरणे कबूल नाही !”**
.....सूर्यकुलं पृष्ठ. ७०

कैलास भाले झुंजार लेखणीचे धनी आहेत. त्यांनी आधी सगळ्यांचं भलं करून, मग आमचंही भलं कर असं म्हणणाऱ्या आपल्या विशाल मनाच्या आईचं कसदार, सत्त्वशील दूध पचवलं आहे. श्रमधर्मी बापाचे कष्ट त्यांना आठवत राहतात. कैलास भाले आपल्या कवितेतून मोठा आशय मार्मिकर्तने वाचकांसमोर ठेवतात. ‘पहाट’ कवितेत ते म्हणतात –

**“तुला पाहून माझ्यातनरत्व**
**आणि मला पाहून तुझ्यात**
**मादीत्त्व जागं होतं**
**तर मग चल ना**
**जातीभेदाची पहाट होण्याआधीच्या**
**त्या अंधारात.”**

**कवितेवर प्रतेक कवी कविता लिहितोच लिहितो.**

**कविता–**
**“ममतेचा पंख**
**गर्जनेचा शंख**
**बंडाचा डंख असते ।”**
.....ठिणगी पृष्ठ. ३

हे ठाऊक असल्याने कैलास भाले वेगळ्या धाटणीची, घुसमट अक्षरबद्ध करणारी ‘कवी’ नावाची कविता लिहितो.

कैलास भाले नावाचा चिंतनशील कवी आपल्या शैलीत व्यक्त होतो. तो म्हणतो –

**“विस्तारित शहराच्या वळणासाठी**
**रेखांकित भूसंपादनात,**
**मांगवाडा उध्वस्त होईल**
**पण कुत्र्यासाठी हातातल्या**
**काठीची, संगिणी होवो**
**दुःख ओले झेलताना**
**मोडलेला माणूस उभा राहो.”**
**अशी अभिलाषा वंदनीय आहे.**

‘चळवळ’ या कवितेत हा निर्भीड कवी मुखवटा लाऊन विद्रोही भाषण करून मोर्चेकऱ्यांना भडकवणाऱ्या नेत्याला अनावृत्त करत त्याचा मुखवटा टराटरा फाडून टाकतो! पोतराजला समज देत अंधश्रध्देला सुरंग लावतो: ‘वाघ’ ‘माती’ या विचार कविताही चिंतनीय आहेत. ‘उकल’ या आशयघन कवितेत कवी म्हणतो –

**“तुझी भूतदया अशी की**
**गाईला चारा टाकून तू**
**ठेवलं पाखरांना पाणी**
**कुत्र्याला भाकर टाकून**
**मुग्यांना साखर ठेवली**
**पण मग दलितांची घरं गावाबाहेर कशी?”**

अद्भुत भूतदयेचं भूत उतारत कवीचा हा प्रश्न खूप गहन आहे.

भाव’ कवितेत अडते, दलालांना अनावृत्त करत ‘काटा आपला आणि तोल त्यांचा’ म्हणत अन्नदात्याची तरफदारी भक्कमपणे करतो. काळया रुळाला ठोकरून स्वातंत्र्य, समता, बंधुतेसह न्यायाचा जयघोष बुलंद करणारा हा जिंदादिल कवी आहे ! भेसळखोरांच्या उरात धडकी भरवण्याचं काम शस्त्र असलेली विद्रोही कविताच करू शकते; हे पटवून देणारा हा डंखबाज कवी आहे !! या आशयघन सत्त्वशील कवितेने विद्रोही कवितेच्या समृद्ध दालनात मोलाची भर घातली आहे.

**अंगारा, धुपारा यावर विश्वास न ठेवता हे युग**
**“मंत्र-तंत्र खोटे, महा खोटा जादूटोणा**
**विज्ञानाच्या सोटयाने खोटे सारे हाणा”**
...रणांगण पृष्ठ ३८

असा मंत्रघोष करण्याचे विज्ञानयुग आहे. याचे या कवीला ज्ञान आणि भान आहे. पर्यावरण वाचवणे हे भूमीसाठी फायद्याचेच आहे अशी या चिंतनशील कवीची भूमिका आहे. आडदांड अंधारात उजेडाने तग धरावा म्हणून आपणच दान आणि दातृत्वाचे धनी बनले पाहिजे असं आवाहन कवीने केलंय. झेंडा, अण्णा, धाव या मर्मभेदक वास्तवतेच्या वेध घेणाऱ्या दमदार कविता आहेत.

‘परिवर्तन’ या कवितेत कवीने फार मोठा संदेश दिला आहे.

**‘ठेविले अनंते तैसेची राहावे**
**चित्ती असू द्यावे समाधान**
**या तत्वज्ञानाने बेचैन झालो तेव्हा**
**अंधारात जन्मलो तरी,**
**अंधारात मरणार नाही म्हणून**
**मूळ गाभ्यालाच हात घालून**
**अनुत्तरित प्रश्नांच्या शोधात**
**सोडली पायरी,**
**तर सुख-शांती-समाधानाचा प्रकाश**
**उत्तर बनून मलाच धुंडाळीत आला !”**

ही कवितेवर अफाट प्रेम करणाऱ्या धेयधुंद कवीची अग्निधर्मी डंखबाज कविता आहे. कटी-मिठी, आलिंगन-चुंबनावर कविता करणाऱ्या, गुलछबू कवींना ती पचणार नाही. थोर विचारवंत आ. ह. साळुंखे यांची पाठराखण हा या अग्नीची लाली मिरवणाऱ्या कवीला मिळालेला मोठा पुरस्कार आहे. विद्रोहाची, समतेची शंख गर्जना करणाऱ्या या कवीला भरभरून शुभेच्छा ! **

# गण्या सांगतोय..... म्हणून पूर्ण शब्दात लिहा

निलेश साठे

गण्या आमचा मित्र लय हुशार आहे बरं. तो सातवीत सातव्यांदा नापास झाला. सातवी शिकला म्हणजे लय शिकला. सातवीपर्यंत पोहोचला म्हणजे हीच खूप मोठी गोष्ट त्याच्या घरच्यांसाठी. गण्या का नाही नापास होणार. त्याला काही काही गोष्टी खूप खटकतात. तो म्हणतो तुम्ही आजकाल जो काही शॉर्टकटचा जमाना आणलेला आहे. तो घंटा मला काही कळत नाही. तुम्हाला जे काय लिहायचं आहे ते पूर्ण शब्दांमध्ये लिहा. आता हेच बघा ना म्हणतो.... लग्नपत्रिकेमध्ये नवरा नवरीसाठी चि.सौ.कां. असे लिहितात. आता चि. म्हणजे काय, सौ म्हणजे काय आणि कां म्हणजे काय. आम्ही काय अर्थ घ्यायचा याचा. बरं कुठेतरी आम्ही स्टँडअप कॉमेडी ऐकलेली असते. चि म्हणजे चिंताग्रस्त. आणि चि सौ का म्हणजे चिंता के सौ कारण. चि सौ का म्हणजे चिरंजीव आणि चिरंजीवी सौभाग्य कांक्षिणी असं आम्हाला कोणी सांगितलंच नाही. मग आम्ही काय अर्थ घ्यायचा. काही काही ठिकाणी एखाद्याच्या नावासमोर आयु असे लिहिले असते. आता ह्या आयुचा अर्थ आम्ही आयो काय घ्यायचा. आयुर्वेदिक म्हणायचं का. आयुष्यमान म्हणायला जागा कमी पडते की काय. की पैसे जास्त खर्च होतात. जोपर्यंत हे पूर्ण शब्द लिहिले जात नाहीत, तोपर्यंत आम्हाला कळणार कसं. तसंच एखाद्याच्या नावासमोर फक्त श्री लिहितात. आता या श्रीचा श्रीमान हा पूर्ण उच्चार बहुतेक लोकांना माहीत नसेल. असेच एक एक अक्षर वापरत राहिला तर एक दिवस स्व आणि कै याचा पूर्ण उच्चारसुद्धा लोक विसरून जातील. आणि संवाद फक्त असा होईल तो कधीचा स्व झालाय. अरे तो दोन वर्षांपूर्वीच कै झालाय. अरे दादा कै म्हणजे काय रे.

बरं काही लोक चुकीचा शब्द उच्चार लिहितात. आशीर्वादचं मुद्दाम आशीर्वाद करणार. हे का बरं. असा चुकीचा शब्दोच्चार लिहून त्यांना काय सुचवायचं असतं. कोणी कोणी काना मात्रा वेलांटी आणि अनुस्वार भलत्या ठिकाणी देतात. ते हे असं का करतात. त्यांना काय सुचवायचं असतं नक्की. की त्यांना अति हुशार म्हणायचं.तरी बरं पत्रव्यवहार आता बंद झाला आहे. नाहीतर पूर्वीच्या पत्रामध्ये मायना लिहिताना रा रा लिहायचे. आरारारा रा. आता हे रा रा काय आहे. सांगितल्याशिवाय आम्हाला कधीच नाही कळणार. आजच्या पिढीला मेलची भाषा कळते. त्याच्याही पेक्षा जास्त फीमेलची भाषा कळते. कारण त्यांच्याकडे जीमेल आहे. आता या जी.... चं घंटा आम्हाला काही कळत नाही. जेव्हा आम्हाला मेल आयडी बनवायची असते. तेव्हा आम्ही ॲट द रेट घमेलं डॉट कॉम असंच बोलतो. कारण आम्हाला फीमेल ची भाषा कळते. आमच्या फिमेलने नुसतं ऐ असं म्हटलं तरी पुढचा सगळा इतिहास आमच्या नजरेसमोर येतो. आम्ही काही जास्त शिकलेलो नाही. आम्ही कधीतरी कीर्तनाला जातो. कीर्तनकाराच्या नावापुढे ह भ प असं लिहिलेलं असतं. त्याचाही आम्हाला कोणीतरी नीट अर्थ सांगा रे. हे जे एक एक अक्षर लिहितात त्याचा पूर्ण उच्चार खरोखर आम्हाला नाही कळत. पण जे काही नजरेस पडतं वाचायला भेटतं ते पूर्ण शब्दात असावं एवढंच आमचं प्रामाणिक मत आहे.

एक वेळ या गण्याचे मत खरं वाटतं, पटतंसुद्धा. काही लोक मुद्दाम शब्दांशी छेडछाड करतात. आणि अर्थाचा अनर्थ करण्यास भाग पाडतात. जो काही शब्द आहे तो पूर्ण शब्द असावा. पूर्ण शब्द लिहिला जावा. अन्यथा पुढची पिढी या एका एका अक्षराचा त्यांच्या त्यांच्या प्रमाणे अर्थ काढून लावतील. मग अर्थाचा अनर्थ होईल आणि गण्यासारखे विद्यार्थी सातवीतच सात वेळा नापास होतील. खरंय ना. **



● श्री. निनाद अशोक पाटील वायशेत यांनी तुळजापूर देवीचा देखावा सादर केलाय त्याचे छायाचित्र. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● श्री. अंबादास हरिदास निकाळजे, मु. सोगाव, ता.अलिबाग. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



● श्री. निलेश आपटे, मु. सुंदरवाडी ता. महाड यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी.




● सौ. संध्या संतोष जाधव रेवदंडा मोठे बंदर सोन्याची जेजुरीचा मनमोहक देखावा साकारला त्याचे छायाचित्र. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● शिवसेना मुरुड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेला आगरदांड्याचा राजा गणराय. (छायाचित्र- राजीव नेवासेकर)



● श्री. दिनेश चौगुले मु. शिलवली ता.माणगाव निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी व परिवार. (छाया- अब्दुल सोगावकर)



● छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिरेखा रेखाटणारे उरण तालुक्यातील विंधणे येथील प्रसिद्ध रंगनायक तथा क्रिकेटपटू रविंद्र पाटील व क्रिकेट शौकीन सहचारणी नयन पाटील हे दाम्पत्य प्रख्यात क्रिकेटपटू यशवंत पाटील यांच्या निवासस्थानात प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गणरायाचे दर्शन घेताना दिसत आहेत. (छायाचित्र- रितू पाटील )



● श्री.सचिन अरुण माळी, तुडाळ यांनी श्री क्षेत्र क्रिष्णाई मंदिर महाबळेश्वरचा नयनरम्य देखावा. मूर्तीकार हेमंत पेडणेकर (छायाचित्र- सुरेश खडपे)

# आरसीबी पीडित कुटुंबांना २५ लाख देणार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नुकत्याच एका दुःखद अपघातात बळी पडलेल्या पीडितेच्या कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. फ्रँचायझीने शनिवारी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, या कठीण काळात संघ कुटुंबासोबत उभा आहे आणि त्यांच्या आयुष्यात थोडी शक्ती देण्यासाठी ही मदत दिली जात आहे. ४ जून रोजी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर आयपीएल २०२५ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या पहिल्या विजेतेपदाच्या जल्लोषादरम्यान चेंगराचेंगरी झाली होती. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५० हून अधिक लोक जखमी झाले.



४ जून रोजी बेंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल २०२५ चे विजेतेपद जिंकल्याचा आनंद साजरा करण्यासाठी विजयी परेड काढण्यात आली. स्टेडियममध्ये प्रवेश करण्याच्या प्रयत्नात अनेक लोकांनी भिंतीवरून उडी मारण्याचा प्रयत्न केला. प्रवेशद्वारावर

## ■ सोशल मीडियाद्वारे दिली माहिती

हजारो लोकांची गर्दी होती. रस्त्यावर लाखो लोक जमले होते. यादरम्यान चेंगराचेंगरी झाली. यामध्ये ११ जणांचा मृत्यू झाला.

कर्नाटक सरकारचा अहवाल १७ जुलै रोजी आला. अहवालात अपघातासाठी आरसीबीला जबाबदार धरण्यात आले होते. त्यात कोहलीचाही उल्लेख होता. कर्नाटक सरकारने म्हटले आहे की, चिन्नास्वामी येथे झालेल्या विजय परेडसाठी आरसीबीने सरकारकडून कोणतीही परवानगी घेतली नव्हती. तथापि, सरकारने असेही म्हटले आहे की कार्यक्रम अचानक रद्द केल्याने हिंसाचार होऊ शकतो आणि शहरातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडली असती. सरकारने १५ जुलै रोजी उच्च न्यायालयात अहवाल सादर केला होता.



● मुरुड तालुक्यातील आगरदांडा येथील व्यावसायिक व मनसे शाखा अध्यक्ष सुप्रेश खोत यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली गणरायाची आकर्षक मंगलमूर्ती. (छायाचित्र- राजीव नेवासेकर)

# अवनी कोळीने आशियाई शूटिंग स्पर्धेत पटकावले कांस्यपदक

। उरण । वार्ताहर ।

दिघोडे गावातील सुकन्या अवनी अलंकार कोळी हिने कझाकीस्तान येथे झालेल्या आशियाई शूटींग चॅम्पियनशिप स्पर्धेत कांस्यपदक पटकावून राष्ट्रीय क्रीडा दिनी आपल्या देशाचं, गावाच नाव सुवर्णाक्षरांनी लिहिल्याने अवनी कोळी हिच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे दिघोडे गावचे माजी सरपंच अविनाश पाटील, सरपंच किर्तीनीधी ठाकूर यांनी अवनी अलंकार कोळी हिचे अभिनंदन केले आहे.



१६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२५ दरम्यान कझाकीस्तान येथे संपन्न झालेल्या १६ व्या आशियाई शूटिंग रायफल शॉटगन डबल ट्रॅप ज़ु. वूमन स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत अवनी अलंकार कोळी हिस वैयक्तिक कांस्यपदक व सांघिक रौप्य हे स्मिता सावंत (महाराष्ट्र) व कृषिका जोशी (गुजरात) ह्यांच्या त्रिकुटास भारतीय संघाला प्रदान करण्यात आले, अवनीने तिच्या ह्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय आशियाई स्पर्धेत दुहेरी पदक मिळवत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. तिच्या ह्या यशाबद्दल सिद्धांत रायफल व पिस्टल शूटिंग क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सेक्रेटरी प्रशिक्षक किशन खारके, सदस्य महेश फुलोरे, अजिंक्य चौधरी, समाधान घोपरकर, प्रशिक्षक व राष्ट्रीय नेमबाज अलंकार कोळी यांनी अवनी कोळी हिचे अभिनंदन केले.

# शुक्ला बीसीसीआयचे तात्पुरते बॉस

**नवी दिल्ली :** वर्ल्ड चॅम्पियन क्रिकेटर रॉजर बिन्नी यांनी बीसीसीआयच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिलाय. त्यानंतर आता उपाध्यक्ष राजीव शुक्ला हे बीसीसीआयचे कार्यवाहू अध्यक्ष झाले आहेत, अशी बातमी समोर येत आहे.

बीसीसीआयने यासंदर्भात अद्याप अधिकृतरित्या कोणतीही माहिती दिलेली नाही. एपेक्स काउंसिलची बैठक पार पडली. या बैठकीत रॉजर बिन्नी यांच्या जागी राजीव शुक्ला हेच अध्यक्षपदी होते. ड्रीम इलेव्हनसोबतचा करार संपुष्टात आल्यावर टीम इंडिच्या नव्या स्पॉन्सरशिपसंदर्भात या बैठकीत चर्चा झाल्याचा उल्लेखही या वृत्तामध्ये करण्यात आला आहे.

## जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धा

# उपांत्यपूर्व फेरीत पीव्ही सिंधूचा पराभव

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताची बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू ही बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिपमधून बाहेर पडली आहे. सहाव्यांदा पदक जिंकण्याचे तिचे स्वप्न भंगले आहे. महिला एकल उपांत्यपूर्व फेरीत इंडोनेशियाच्या पुत्री वर्दानीकडून तिला पराभव सहन करावा लागला.



जागतिक क्रमवारीत पीव्ही सिंधू १५ व्या स्थानी आहे. आज झालेल्या सामन्यात पीव्ही सिंधूने पहिल्या सेटमध्ये धीम्या गतीने खेळ सुरू केला होता. १४-२१ ने पहिला सेट गमावल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये सिंधूने चांगली पकड मिळवली. या सेटमध्ये वर्दानीवर मात केली. मात्र अंतिम तिसऱ्या सेटमध्ये वर्दानीने पुनरागमन करत विजय प्राप्त केला.

उपउपांत्यपूर्व सामन्यात चीनच्या वांग झी यी विरोधात खेळताना सिंधूने सामन्याला चांगली सुरुवात केली. वेगवान स्मॅश आणि नेटजवळील खेळाच्या जोरावर सिंधूने गेमच्या मध्यंतरापर्यंत ११-६ अशी आघाडी घेतली. मात्र, गेमच्या दुसऱ्या टप्प्यात वांगने खेळ उंचावत गेम १९-१९ असा बरोबरीत आणला. मात्र, सिंधूने संयमाने खेळ करीत पहिला गेम जिंकत आघाडी मिळवली. दुसऱ्या गेममध्येही सिंधूने दबाव कायम राखताना आघाडी मिळवली.

## आशियाई नेमबाजी स्पर्धा

# विक्रमासह अंकुर मित्तलला सुवर्ण

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय नेमबाजांचे आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील वर्चस्व शुक्रवारीही कायम राहिले. अंकुर मित्तल याने डबल ट्रॅप प्रकारात आशियाई विक्रमासह सुवर्णपदकाला गवसणी घातली. कझाकस्तान येथे ही प्रतिष्ठेची स्पर्धा सुरू आहे.



अंकुर मित्तल याने १०७ हिट मारत सुवर्णपदक आपल्या नावावर केले. कझाकस्तानच्या आर्टीओम चिकुलायेव याने ९८ हिटसह रौप्यपदक पटकावले. कुवेतच्या अहमद अलाफासी याने शूटऑफमध्ये आपला खेळ उंचावत ब्राँझपदकाची कमाई केली. अंकुर मित्तल याने सांघिक विभागातही सुवर्णपदक जिंकले. भानू प्रताप सिंग व हर्षवर्धन काविया यांच्या साथीने त्याने भारताला ब्राँझपदक मिळवून दिले.

ज्युनियर विभागातील डबल ट्रॅप प्रकारात हातीम खान मोहम्मद याने ८९ हिटसह रौप्यपदक पटकावले, तर मानव राजसिन्ह चुडासामा याने ८७ हिटसह ब्राँझपदक जिंकले. हातीम खान व मानव चुडासामा या दोघांसह विनय प्रताप सिंग (८१ हिट) याने सांघिक विभागात भारताला सुवर्णपदक मिळवून दिले.

**महिलांमध्ये नेत्रदीपक यश**

महिलांच्या डबल ट्रॅप प्रकारात भारतीय खेळाडूंनी नेत्रदीपक यश संपादन केला. अनुष्का सिंग, राजकुवर प्रणील इंगळे, येशाया हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांनी अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व ब्राँझपदकावर नाव कोरले. तसेच या तिघींनी मिळून सांघिक विभागात सुवर्णपदकावर हक्क सांगितला.

महिलांच्या ज्युनियर विभागात अवनी अलंकार कोळी हिने ७७ हिटसह ब्राँझपदक पटकावले. तसेच अवनी कोळी, क्रिशिका जोशी व स्मिता सावंत यांनी सांघिक विभागात रौप्यपदकाची माळ गळ्यात घातली.

## गोलंदाज दिलशान मधुशंकाची हॅट्ट्रिक | निसांका, लियानागे आणि कामिंदूची अर्धशतके

# श्रीलंकेचा झिम्बाब्वेवर ७ धावांनी विजय

। हरारे । वृत्तसंस्था ।

डावखुरा वेगवान गोलंदाज दिलशान मधुशंकाच्या हॅट्रिकच्या जोरावर श्रीलंकेने पहिल्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेचा ७ धावांनी पराभव केला. यासह, श्रीलंकेच्या संघाने २ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. हरारे स्पोर्ट्स क्लबमध्ये प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ६ विकेट्स गमावून २९८ धावा केल्या. संघाकडून पथुम निसांका, जानिथ लियानागे आणि कामिंदू मेंडिस यांनी अर्धशतके झळकावली.



शुक्रवारी झिम्बाब्वेचा संघ ८ विकेट गमावून फक्त २९१ धावा करू शकला. संघाला शेवटच्या षटकात १० धावांची आवश्यकता होती, परंतु मधुशंकाने पहिल्या ३ चेंडूत ३ विकेट घेत सामना उलटला. त्याला सामनावीर म्हणूनही निवडण्यात आले. झिम्बाब्वेकडून सिकंदर रझा यांनी ९२, बेन करन यांनी ७० आणि शॉन विल्यम्स यांनी ५७ धावा केल्या.

शेवटच्या षटकापर्यंत झिम्बाब्वेचा संघ सहज विजयाकडे वाटचाल करत होता. पण त्यानंतर वेगवान गोलंदाज मधुशंकाने सलग तीन चेंडूत तीन बळी घेतले. त्याने सेट फलंदाज सिकंदर रझा, ब्रॅड इव्हान्स आणि रिचर्ड नागरवा यांना बाद करून हॅट्रिक घेतली.

झिम्बाब्वेचा अष्टपैलू खेळाडू सिकंदर रझाने शानदार खेळी केली, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. झिम्बाब्वेचा अर्धा संघ १६१ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर, सिकंदर रझाने टोनीसह शतकी भागीदारी केली. दोघांनी सहाव्या विकेटसाठी १२८ धावांची भागीदारी केली. सिकंदरने ९२ धावांची खेळी केली. टोनी एका बाजूला उभा राहिला. त्याने ४३ धावा केल्या.

धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात खराब झाली. संघाने ब्रेंडन टेलर आणि ब्रायन बेनेट यांना शून्य धावांवर गमावले. त्यानंतर कर्णधार शॉन विल्यम्सने बेन करनसोबत शतकी भागीदारी केली. दोघांनीही आपापले अर्धशतक झळकावले. बेन करनला असिता फर्नांडोने ७० धावांवर बाद केले. शॉन विल्यम्सला कामिंदू मेंडिसने ५७ धावांवर पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)